# स्वकुळ समाचार

वर्ष - ६ अंक -१० ठाणे सप्टेंबर २०२० पाने - ४३ वार्षिक वर्गणी रु. ३००/-



अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
*ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित*
नोंदणी क्र. ई/९२८/ठाणे दि. १७/५/८८

# स्वकुळ समाचार

RNI No. MAHMAR/2014/57230

❖ नविन सभासद २००० रुपये (१५ वर्षाकरिता)
१५०० रुपये (१० वर्षाकरिता)
१००० रुपये (५ वर्षाकरिता)
❖ उपवरवधू नोंदणी (प्रत्येक अंकासाठी) रु. ७५/- व फोटोसह रु. १५०/-
❖ उपवरवधू नोंदणी सलग वर्षभर रु. ७५०/- व फोटोसह रु. १५००/-
❖ विश्वस्तनिधी १५०१/- रु. ❖ आधारस्तंभ १५०१/- रु. ❖ पृष्ठदान १५००१/- रु.
❖ मंगलनिधी ५०१/- रु.

स्वकुळ समाचार या नावाने डोंबिवली नागरी सहकारी बँक मधील आमच्या खात्यावर पैसे भरलेल्या पावतीसह आपल्या सर्व प्रकारचे लिखित साहित्य किंवा मजकूर आपण ई मेलवरही पाठवू शकता

You can transfer your Amount to SWAKUL-SAMACHAR from any bank
Favouring : Swakul Samachar
Bank Name : Dombivli Nagari Sahakari Bank.
Branch : Nandivli
IFCS CODE : DNSB0000009
Saving A/c No. 009010100002199
email
sampadakswakulsamachar@gmail.com

**कार्यालयः** फ्लॅट नं. ०१, साईसेवा नं. २ को. ऑप. हौ. सोसा., जन. अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे ४२१२०१

**अध्यक्षः श्री. विनोद वसंतराव सजगुले**
रुम नं. १४७, साई नगरी समोर, मीठबंदर रोड,
डॉ. कोळी क्लिनीकच्या बाजूला, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पूर्व)
पिन-४००६०३ मोबा.: ९८९२३९३३७१/०२२-२५३२८९६३
**सचिवः** श्री. राजेश शंकरराव साळी, ९९६७५८४०३२
**सहसचिवः** सौ. शैलजा सोमनाथ कासटकर, ९८२०१४५४५१
**उपाध्यक्षः** श्री. प्रकाश वासुदेव पावले, ८८०६९८७५६४
**कोषाध्यक्षः** श्री. ईश्वरलाल एकनाथ फंड, ८६५२२१५१६३
**अंतर्गत हिशोब तपासणीसः** बारसु सिताफळे, ९३२६१८२४३५
**आर्थिक सल्लागारः** श्री. नितीन ढवण(सीए) ९८२२४५६७६६

**सल्लागारः** श्री. भालचंद्र नेमिचंद साळी, ९७०२६४४२३२
श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर, ९८२०८२१७२६
डॉ. किसनराव जगन्नाथ जेधे, ९८३३८२०६०१
श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव, ९७५७०८६९१५

**संपादक : श्री. गोपाळ सुकलाल थोरात**
घरकुल हौ. सोसा., रुम नं.५१७७, मारुती मंदिराजवळ,
शिवाजी नगर, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१ मो.: ७७०९३१५४९८
**सहसंपादक :** श्री. अविनाश शंकर धोत्रे, ९५०३३१२५६६
**सहसंपादकः** श्री. रमेश विष्णुदास बारगजे, ९८६९४८३६००
**संपादक मंडळः** श्री. पुरुषोत्तम जगन्नाथ साळी,८४२१९१०४३७
श्री. सुधाकर शिंदे, ९३२२०५९७४७
श्री. शशिकांत डहाके, ९८९२०२३७६३
**तांत्रिक समितीः श्री. उदयकुमार साळी,९३२३३८६१३९**
**(DCE, B.Tech, Civil)**
**तांत्रिक सल्लागार, सामान्य प्रशासन, ठाणे जिल्हा**
**वेब डिझायनरः श्री. बाळकृष्ण साळी, सुरत १०३३६०३६१३**
**सदस्यः** श्री. राजेश जगन्नाथ साळी, ९२०९२०३६९६
श्री. पंकज अरुण दिवटे, ९८२०८८२२८९

**कायदेशीर सल्लागारः** ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे
बी.कॉम.,एल.एल.बी.,जी.डी.सी. ॲण्ड ए
मो.: ९८३३५२७१२२

## अधिकृत प्रतिनिधी

१)श्री. संजय सुरेश खोपे, खोपोली९५६१८१९१९३
२)श्री. अशोक शिवदास साळी,सुरत९९०९६०१९७०
३)श्री. प्रविण जी. ढवण, विंचूर ९८८१५८२७२९
४)श्री. पंडित माधवराव साळी, एरंडोल ९४२३३४३८३०
५)श्री. बाळकृष्ण मारूतीराव डमरे, बडोदा ९४२६०२५११४
६)श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण९०२१५६४०२८
७)श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, नाहूर ८७७९१७२९८६

**नविन अधिकृत प्रतिनिधींच्या नियुक्ती साठी अर्ज मागविण्यात येत आहे.** - १) प्रतिनिधीचे वय २१ ते ७० या दरम्यान असावे. स्थानिक संस्थेचे सभासद असावेत. २) स्वकुळ समाचारसाठी जास्त वेळ देणारे तसेच नविन सभासद, जाहिरात, देणगी, इमारतनिधी आणि आपल्या विभागातील कार्यक्रमाचे वृतांन्त तातकाळ देणारे असावेत. ३) संस्थेबद्दल आस्था असणारे सुशिक्षित व संस्थेसाठी तन,मन,धन अर्पण करणारे असावेत.

**जाहिरातीचे दर**

| | | |
|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान रु. ४५००/- | साधे पूर्ण पान रु. १२००/- | साधे पावपान रु. ३००/- |
| रंगीत अर्धेपान रु. २५००/- | साधे अर्धेपान रु. ६००/- | शुभेच्छा रु. २५१/- |

बातमी मधील एक कृष्ण धवल पासपोर्ट साईज फोटो करीता रु. १००/- (फोटोची ईमेज चांगली हवी)

साळी हिताय स्वकुळ संवर्धनाय ।

३६ वर्ष अंक ३७४

## संपादकीय .....

### संपादकीय (कोविड - पश्चात )

नमस्कार,

जय जिव्हेश्वर,

माहे ऑगस्ट २०२० मधील भगवान श्री जिव्हेश्वर जयंती उत्सव, विणकर दिन आणि गणेशोत्सव सर्वांनी एकत्र येऊन धुमधडाक्यात साजरा न करता प्रत्येकाने आपापल्या धरी स्वतंत्रपणे काळजी घेऊन साजरा केला. त्याची क्षणचित्रे समाजबांधवांनी व्हॉट्सअप माध्यमातून प्रसारीत केली. त्यातील काही वृतांत या अंकात आम्ही देत आहोत.

कोविड-१९ महामारीचा प्रभाव कमी न होता वाढत चालला आहे. कोविड बाधितांच्या यादीत भारताचा क्रमांक जगात आता दुसरा आहे. भारतातील टाळेबंदी काही अंशी उठवण्यात आली आहे. बरेच व्यवहार सुरू झालेत, अजून बरेच सुरु व्हायचे आहेत. अर्थव्यवस्था नुसती डळमळीतच झाली नाही तर पार रसातळाला गेली. खालच्या स्तरांतील मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडून टाकले. चांगल्या नोकऱ्या जाऊन करोडो बेरोजगार झाले. व्यवसायांची साखळी पूर्ण उध्वस्त झाली. ती जुळून येण्यास कदाचित वर्षही जाईल. तोपर्यंत नोकऱ्या, रोजगार, व्यवसाय कर्मीच काय याच उत्तर अनुत्तरीत आहे. याच काळात महागाई देखील सर्व स्तरांत वाढलेली दिसून येते. मुळातच उत्पन्नाचे स्त्रोत कमी अन् प्रत्येक वस्तू महाग वैद्यकीय उपचार महाग! उत्पन्न आणि खर्च याचा ताळमेळ बिघडलेला आहे. भविष्याकडे बघता माणूस भयभीत आहे. वैद्यकीय उपचारांनी माणूस कसा भरडला जातोय याच्या कहाण्या ऐकण्यात व वाचण्यात येताहेत. खाजगी रुग्णालयात दखल झालेल्या रुग्णांची लाखोंची बिले पाहूनच चक्कर येतेय. कोरोनावर कुठलीही औषधे नसतांना आजारी वयोवृध्दांची रुग्णालयांची बिले पाहता ती अनाकलनीय वाटतात. असा प्रकार यापूर्वी थोडा होता तो आता खूप वाढलाय. या लूटमारीला माणुसकीची कुठलीही किनार नाही. वास्तविकता उत्पन्नाचे स्त्रोत हरवलेल्या माणसांसाठी आजारपणात माफक दरात उपचार उपलब्ध व्हायला हवेत असे न होता प्रचंड लूटमार ! काय चाललय काय ! हरघडी माणूसकीचे डोस पाजणारा माणूसच बघा काय करतो. लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण. असाच प्रकार आहे. माणुस हा अप्पलपोट्या, ढोंगी, मतलबी, स्वार्थी या विशेषणांनी सुशोभीत होतोय. काळ सोकावत चाललाय. माणुसही सोकावत चाललाय. मग भविष्यात अनिश्चितता, अंधार दिसणार नाही तर काय ?

आंतरराष्ट्रीय परिस्थितीही बिघडत चालली. चीनने आपल्या बळकावू वृत्तीने सर्व राष्ट्रांवर युध्दाचे संकट आणलेय. प्रत्येक राष्ट्र युध्दसज्ज होतय. भारतावर हे संकट अधिकच गहिरे आहे कारण कोरोनाविरुध्द युध्द आणि चीन-पाकिस्तान विरुध्द युध्द, तसेच आर्थिक आघाडिवर युध्द ! सर्वसामान्यांच तर आपल्या जीवनाविरुध्द युध्द, किती अनिश्चीतता ! युध्दात कोणीही जिंकत नसतं किंवा हरत नसतं. तो फक्त देखावा असतो, नियतीचा !

असो, या कठीण काळात समाजबांधवांच देहावसन झालं. आपल्या स्वकुळ समाचारचे प्रथम जेष्ठ श्रेष्ठ संपादक श्री.श्रीकृष्ण साळी सर, प्रसिध्द प्राध्यापक श्री.नारायण मिसाळ हेही आपणांस सोडून गेले. त्या सर्वांना ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज, स्वकुळ समाचार व महिला मंडळातर्फे विनम्र आदरांजली !

स्वकुळ साळी समाचारच्या सर्व वाचक सभासदांना विनंती करण्यात येते की, स्वकुळ समाचारच्या दीपावली विशेषांक २०२० साठी आपले लेख,कविता,कथा,इतर लेखन साहित्य व स्वकुळ समाचारचे मुख्यस्रोत असलेल्या उत्पन्नाचे साधन म्हणजे जाहिराती. कृपया दिनांक १८ ऑक्टोबर २०२० पर्यंत स्वकुळ साळी समाचारच्या (smpadakswakulsamchar@gmail.com) या ई-मेलवर पाठवण्यात याव्यात. दीपावली विशेषाकांच्या जाहिरात फॉर्म याच अंकात प्रसिध्द केला आहे.

तर आता येथेच थांबतो पुन्हा भेटूया दीपावली विशेषांकात.

जय जिव्हेश्वर !

✍ - गोपाळ सु. थोरात, संपादक



।। श्री गणेशाय नमः ।।

# पुरुषोत्तम मास (अधिक मास)

अधिक अश्विन कालावधी
दि. १८/९/२०२० ते १६/१०/२०२०



श्री. बारसु रामदास सिताफळे
अंतर्गत हिशोब तपासणीस व माजी कोषाध्यक्ष
ठा. जि. स्व. सा. समाज / स्वकुल समाचार मो. ९३२६१८२४३५

संपूर्ण जगामध्ये भारतदेश श्रेष्ठ व पूण्यभूमी आहे. आपल्या भारत देशात तिथी, वार, नक्षत्र, मराठी बारा महिने, घटीका, पल, प्रहर, ऋतु, मुहुर्त व दोन्ही अयने, समुद्र, तलाव, विहीरी, लता, औषधी वृक्ष, नगरे, ग्राम, पर्वत या सर्वांना महत्व असून ते पूज्य मानले जातात कारण यांचा प्रत्येकाचा स्वामि देवता आहे. त्यांची त्या अधिकाराप्रमाणे पुजा होऊन फल देतात. अशाच प्रकारे अधिक मास दर तीन वर्षांनी येतो. त्याचे फारच महत्व आहे. अधिक मास कसा निर्माण झाला आहे त्याचे विश्लेषण भगवान नारायणने नारद ऋषींना सांगितले आहे की, दर वर्षी (संवत्सर) मध्ये बारा महिने असतात, मग हा तेरावा महिना कसा निर्माण झाला. त्याविषयी मी आपणास त्याची उत्पत्ती कशी झाली ते सांगतो. विश्वाचे कल्याण किंवा अकल्याण हे सत्कर्म व दुष्कर्मावर अवलंबुन असते. आज काल दुष्कर्माचे प्रमाण वाढल्यामुळे हे पाप बारा महिन्यांना सहन न झाल्यामुळे त्या बारा महिन्यांनी आपल्या शरिरातील फक्त पापाचा तीसरा हिस्सा बाहेर काढला. त्या पापापासून तेरावा महिना अधिक मास उत्पन्न झाला तो पापमय असल्याने त्याला मलिनमास असे नाव पडले. या अधिकमासा मध्ये रविचे संक्रमण होत नाही. तसेच शुभकार्य होत नाही. यामुळे अधिकमासाला फार वाईट वाटत असून तो नेहमी दुःखी, चिंतेत असायचा. त्या चिंतेन तो मरणमुख झाला होता. परंतु मोठया धैर्याने त्याने भगवान श्रीविष्णूंना शरण जाऊन दंडवत प्रणाम घातला. तो भगवान विष्णूंना म्हणाला मी येथे आला असुन माझे रक्षण का करीत नाहीस. अनेक व्यक्तिंनी मला मलमास म्हणून तुच्छ मानले आहे. जसे बारा महिन्यांना त्यांचे स्वामी आहे तसा माझा कोणीही स्वामी नाही म्हणून मला शुभकार्यास व्यर्ज मानले आहे. असा दुःखीत होऊन अश्रु ढाळीत ऊभा राहीला तेव्हा भगवान विष्णू म्हणाले या वैकुंठात कोणीही दुःखी रहात नाही किंवा मरणाचे भय नाही. हे नित्य व आनंदमय असे स्थान आहे. म्हणून तू दुःखी का बरे आहेस. तेव्हा अधिकमास भगवान विष्णूंना म्हणाला तू जगाचे पालन करणारा जगदिश्वर असून मी दुःखी होऊन मरणास टेकला आहे. तरी पण तू माझे रक्षण करीत नाही. याप्रमाणे अधिकमास असे म्हणत भगवान श्रीविष्णूंच्या चरणी मुर्छित होऊन पडला. त्याचवेळी गरुडाने पंखांनी वारा घालुन सावध केले तेव्हा भगवान विष्णूंना म्हणाला माझे रक्षण कर असे म्हणत थरथर कापु लागला व वारंवार रुदन करु लागला. तेव्हा भगवान श्री विष्णू म्हणाले जरी मी जगाचा स्वामी ईश्वर असला तरी तुझे रक्षण करणे मला कठिण वाटत आहे. असा मनाशी विचार करुन अधिक मासाला श्री विष्णू म्हणाले, की तू माझ्या बरोबर गो-लोकात चल तेथे भगवान श्रीकृष्ण पुरुषोत्तम ईश्वर असतो तो परब्रम्ह असून पूर्ण पुरुषोत्तम आहे. तो तुझे रक्षण करील असे म्हणून त्याचा हात धरुन श्री विष्णूंनी त्याला गो-लोकात आणले. तेव्हा प्रथम तेथील तेजाने त्याचे नेत्र

दिपुन गेले व क्षणभराने त्याने आपले नेत्र उघडून श्रीविष्णूने अधिकमासाला हळूहळू श्रीकृष्णा जवळ नेले. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने श्री विष्णूला विचारले की हा कोण आहे ? हा का रडत आहे ? या गो-लोकात कोणालाही दु:ख भोगावे लागत नाही. येथे सर्व आनंदात राहुन स्वप्नातही दु:ख होत नाही. तेव्हा श्रीविष्णू म्हणाले हा माझ्या सोबत आलेला मलमास आहे व याला कोणीही स्वामी किंवा देवता नाही याच्या कालावधीत रविचे संक्रमण मोजित नाही व कोणतेही स्नान, दान, व्रत केले जात नाही कारण याचा अधिष्ठाता असा कोणताही देव नाही. त्यामुळे याचा सर्व तिरस्कार करतात म्हणून मी तुझ्या आश्रयाला गो-लोकात आणले आहे. मी माझे सर्व कार्ये सोडून येथे आलो आहे म्हणून माझ्यासाठी याचे दु:ख दुर कर. अशी विनंती भगवान पुरुषोत्तमाला केली. तेव्हा ते म्हणाले तू येथे आणले हे फार चांगले केले यासाठी सुध्दा तुझी सत्कीर्ती होईल. श्री भगवान पुरुषोत्तम म्हणतात की मी या जीवाला आतापासून आपलेसे केले असून याला मी सर्वांपेक्षा श्रेष्ठ व माझ्या योग्यतेचे स्थान देतो. वेदामध्ये माझे जे पुरुषोत्तम असे नाव प्रख्यात आहे ते ही मी याला देत आहे. याच्या नावाने जग पवित्र होईल व यापुढे सर्व महिन्यांचा अधिपती होईल व जगाला वंदनीय होऊन सर्व याची पूजा करतील त्यामुळे सर्वांचे दु:ख, दारीद्रय दुर होऊन धन, संपत्ती, आरोग्यशील होतील.

सर्व महिने सकाम म्हणजे स्वार्थ युक्त कर्म करण्यासाठी गणले जातात, पण हा महिना निष्काम कर्मासाठी आहे. निष्काम कर्माने जो अधिक मासाची पूजा करेल तो माझ्या गो-लोकात येऊन त्याला मोक्ष प्राप्ती मिळेल. पुढे भगवान पुरुषोत्तम असे म्हणाले की एक वेळ माझ्या भक्ताचा अपमान झाला तरी तो क्षम्य ठरेल परंतु पुरुषोत्तम मासाच्या भक्ताच्या बाबतीत जर कोणी अपराध केला तर त्याला मी क्षम्य करणार नाही. माझ्या भक्ताच्या इच्छा पूर्ण करण्यास मी विलंब करेल परंतु अधिक मासाच्या भक्ताच्या ईच्छा मी त्वरीत पूर्ण करतो. या मासामध्ये जे लोक जप, दान, सत्कर्म, स्नाने, देव, तीर्थस्थाने, ब्राम्हण यांचा द्वेष करतील त्यांना नेहमी दु:ख भोगावे लागेल. परंतु पुरुषोत्तम मासात स्नान, पूजा, दान ईत्यादी भक्तीभावाने करतील ते धन, पुत्रादिकाचे सुख भोगून गो-लोकात वास करतील.

श्री भगवान पुरुषोत्तम म्हणाले की माझ्या आज्ञेनुसार या माझ्या अधिकमासाची पूजा करतील त्यांना मोक्ष प्राप्त होईल व तसेच मी या अधिकमासाला माझ्याही पेक्षा श्रेष्ठ व उत्तम पद दिले आहे. म्हणून श्री विष्णू भगवान तू या अधिकमासाची चिंता सोडून त्याला वैकुंठात घेऊन जाऊन त्याचा निवास कर. अशी आज्ञा भगवान श्री पुरुषोत्तमांनी देऊन श्री विष्णूने त्याला कायमचे वैकुंठात स्थान दिले आहे. त्यावेळे पासून पुरुषोत्तममास जगाला वंदनीय झाला आहे.

**पुरुषोत्तममासाची फलश्रुती :**

१) अधिकमासात तिर्थाच्या ठिकाणी जो स्नान करतो तो ब्रह्म हत्येपासून मुक्त होतो. कार्तिक व मार्गशिर्ष आदि महिने कोणीही याच्या बरोबर नाही.

२) गंगास्नान बारा हजार वर्ष केल्याने जे फळ मिळते व गुरु सिंह राशीत असतांना गोदावरी नदीत स्नान केल्याने जे पुण्य मिळते ते फळ या पुरुषोत्तम मासात कोणत्यही तिर्थात एकाचवेळी स्नान केल्याने मिळते.

३) बारा महिन्यांमध्ये व्रत, दान, जप, पूजा इत्यादी आहेत त्यांनाही अधिक मासाच्या सोळाव्या अंशा इतकी

योग्यता नाही.

४) अधिक मासात एक दिवस सुध्दा उपवास करेल त्याची अनंत पापे जळून तो विमानात बसुन गो-लोकी जातो.

५) पुरुषोत्तम मासात एक महिना व्रत करणाऱ्यास म्हणजे नक्त भोजन करणाऱ्यास (रात्री भोजन) अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य मिळते.

६) पुरुषोत्तम मासात दिपदान किंवा देवापुढे सतत महिनाभर तिळाचा किंवा गाईच्या तुपाचा दिवा लावल्यास ऐश्वर्य, धन-धान्य, विपुल संपत्ती व सर्व सुखे मिळतात. सर्व तीर्थे, योग, ज्ञान, सकलशास्त्र दिपदानाच्या १६व्या भागाबारोबरीने ठरणार नाही.

७) पुरुषोत्तम मासातील फक्त दोन कमला एकादशीचे व्रत दि. २७/९/२०२० व १३/१०/२०२०केल्यास त्याला गो-लोकाची प्राप्ती होते.

८) पुरुषोत्तम मासात जेवण करतांना मौन धारण करतो त्याला व्रत व उपवासाचे फल प्राप्त होते.

९) पुरुषोत्तम मासाची फक्त स्तुती जरी केली तरी त्यामुळे त्याला सुख-समृध्दी मिळते.

१०) पुरुषोत्तम मासात अपुप म्हणजे अनारसे दान करावे. अनारस्याला जेवढी छिद्रे असतात तेवढी वर्षे तो गो-लोकात निवास करतो.

११) पुरुषोत्तम मासात तीळ, जवांनी जो स्नान करतो त्याला सुख-संपत्ती, ऐश्वर्य प्राप्त होते.

शुभम् भवतु .......

## जेष्ठ-श्रेष्ठ श्रीकृष्ण साळीसर - व्यक्तिपरिचय



ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार या प्रकाशनास गुरुतुल्य असलेले श्रीकृष्ण साळी सर यांचे दि.१५/८/२०२० रोजी वयाच्या ८२व्या वर्षी त्यांच्या पवई येथील राहत्या घरी अचानक निधन झाले. त्यांचा परिचय.

१) सन १९८२ साली ठाणे स्वकुळ या त्रैमासिकाचे ते प्रथम संपादक झाले. (सन १९८२-१९८८)

२) सन १९८८ ते १९९१ मध्ये ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्ष.

३) त्यांच्याच काळात ठाणे स्वकुळ या त्रैमासिकाचे संपादक झाले.

४) सन १९९८२ पासून ठाणे जिल्ह्याचे त्रैवार्षिक अधिवेशन भरत आले त्यासाठी त्यांची रुपरेषा व मार्गदर्शनासाठी त्यांची मोलाची मदत होत असे.

५) सन १९९१ ते १९९४ या कालावधीत ते स्वकुळ समाचारचे पुन्हा संपादक झाले.

६) ठाणे जिल्हा स्वकुळ समाजाच्या स्वप्नपुर्ती या वास्तु साठी त्यांनी तात्काळ रु.१ लाख वास्तुनिधी अर्पण केला.

७) ते उच्च विद्या विभूषित होते. आदर्श शिक्षक होते. ४ थ्या प्रांतिक अधिवेशनातील स्वकुळ वैभव या पुरस्काराने सन्मानित होते.

८) गुजराथी भाषेवरही त्यांचे प्रभुत्व होते.

९) अतिशय शांत, मनमिळाऊ, दानशुर, अभ्यासू, व्यासंगी उत्तम सल्लागार व मार्गदर्शक अशा अनेकाविध गुणांनी विभूषित असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री.श्रीकृष्ण साळी सर !

कै. लिलाबाई मोरोपंत झिकरे(आई) कै. कांताबाई बाळासाहेब झिकरे यांच्या स्मरणार्थ श्री. बाळासाहेब मोरोपंत झिकरे, अहमदनगर, श्री. मधुकर मोरोपंत झिकरे, सौ. पद्माबाई मधुकर झिकरे, श्री. अनिल मधुकर झिकरे, सौ. त्रिवेणी अनिल झिकरे, बडोदा यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

दिनांक ३१/०८/२०२०

प्रिय सहकारी मित्रांनो,



आज ३१ ऑगस्ट २०२०, माझ्या रयत शिक्षण संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतील शेवटचा दिवस. आज मी आपणा सर्वांसोबत घालवलेल्या वेळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मुद्दामहून लिहित आहे. नि:संशयपणे हा एक लांब प्रवास होता. रयत शिक्षण संस्थेमध्ये एकूण ३४ वर्षे ९ महिने १६ दिवस सेवा करून आज मी सेवानिवृत्त होत आहे. मन गहिवरून आले आहे. सन १९८५ साली विंचूर शाखेतून शिपाई पदापासून सुरुवात केली.

४ वर्षे शिपाई पदावर काम केल्यानंतर बाहेरून उच्च शिक्षण पूर्ण केले व सन १९८९ पासून उपशिक्षक पदावर बढती मिळाली. सन २०१८ पर्यंत २९ वर्षे विंचूर व २ महिने वनसगाव शाखेत उपशिक्षक म्हणून सेवा बजावली. पुन्हा बढतीने विंचूर शाखेत उपमुख्याध्यापक व प्रभारी मुख्याध्यापक म्हणून सन २०१८ ते २०१९ सेवा केली. अखेरच्या वर्षात आज रोजी मी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय कोपरगाव जि.अ.नगर येथे सेवानिवृत्त होत आहे.

या कार्यकाळात आपल्यासारख्या अनेक मित्र, सहकारी बंधू-भगिनी व गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळे मला सक्षम आणि प्रोत्साहित केले त्याबद्दल मी आपला मनस्वी आभारी आहे. या सेवाकाळात आपण सर्वांनी केलेले सहकार्य व प्रेम सदैव स्मरणात राहील. कोव्हीड १९ मुळे इच्छा असूनही सेवापुर्तीचा कार्यक्रम घेता येत नसल्याने मी सर्वांची दिलगिरी व्यक्त करतो. आपण सर्व या माझ्या प्रवासात सहभागी झालात त्याबद्दल पुनश्च: एकदा धन्यवाद !! यापुढेही आपले मार्गदर्शन, सहकार्य व प्रेम सदैव लाभत राहो ही नम्र विनंती.

कळावे.

आपलाच,
प्रविण गोपीनाथ ढवण (विंचूर)

| | |
|---|---|
| कै. महादेव बाळा दुर्गुळे, कुडली यांच्या स्मरणार्थ श्री. सदानंद महादेव दुर्गुळे व सौ. शारदा सदानंद दुर्गुळे, भिवंडी यांच्या सौजन्याने पृष्ठदान. | कै. शामराव द. अहिरराव (वडील), कै. श्रीमती नादरबाई शा. अहिरराव (आई) व कै. पुरुषोत्तम शा. अहिरराव (बंधू) यांच्या स्मरणार्थ श्री. पंढरीनाथ शामराव अहिरराव यांच्या सौजन्याने पृष्ठदान. |

## श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव २०२०
## बृहन्मुंबई स्वकुल साळी समाज




उत्सव शब्द उच्चारला तरी उत्साह आणि आनंदात वावरणारा जनसमुदाय नजरेसमोर येतो. तोच उत्साह आणि आनंद प्रत्येकवर्षी आपणास श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव साजरा करताना दिसतो. याहीवर्षी तो आपण अनुभवला असणारच, परंतु कोरोना महामारीने त्यावर मात केली. प्रत्येक ज्ञातिबांधवांनी आपल्या धरीच जन्मोत्सव साजरा करण्याला पर्यायच नव्हता. त्याच तयारीला सारे लागलेही, मात्र श्री.दत्ता साळी यांनी अखेरीस थोडा वेगळा विचार केला. हा विचार त्यांनी माझ्यापुढेही मांडला आणि ही कल्पना मला खूपच आवडली. हा उत्सव साजरा झाला त्यांच्या दुकानात चश्माघर येथे.

गरज पडेल तेव्हा उत्सव मंडळाचे कार्यालय झालेले हे दुकान, उत्सवाच्या अनेक वस्तुंनीही जिथे अनेकदा वास्तव्य केले, त्याच वास्तुत श्री जिव्हेश्वरांचा उत्सव ह्या संकल्पनेला अजाणतेपणी लाभलेला एक भावनिक स्पर्शही होता. आणि म्हणुनच शब्दशः उत्सव तेथे संपन्न झाला.

शनिवार दिनांक १ ऑगस्ट २०२० ला पहाटे पोथीवाचन, जन्मोत्सव, पाळणा, आरती सर्वकाही नेहमीच्याच साग्रसंगीत पध्दतीने, श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव साजरा झाला. याप्रसंगी सौ.कांचन दत्ता साळी, रोहन साळी, व श्री.प्रवीण साळी उपस्थित होते. पहाटेच फोन करून अध्यक्ष श्री.बारगजे साहेबांनी शुभेच्छा दिल्या. आदल्याच दिवशी रोहन व राजनने गुगल मीटची तयारी केली व दत्ता साळी यांनी सर्वांना ग्रुपवर माहिती दिली होती, त्यानुसार पहाटे आलेली लिंक ओपन करून मी माझ्या घरीही दत्तासोबतच जन्मोत्सव साजरा केला. पूजा व प्रसादासाठी नंतर श्री. राजन साळी, सौ.संचिता साळी व अर्णव हेही आले होते.

उत्सव दुकानात असला तरी प्राप्त परिस्थितीच्या मर्यादेत राहून दत्ता साळी यांनी, कोणालाही आमंत्रित न करणं स्वाभाविक होतं, मात्र नेहमीच्याच उत्साहाने मी स्वतः पूजा आटोपून आठ वाजता दुकानात हजर झालो. दर्शन व प्रसाद घेतल्यानंतर उत्सवात दरवर्षी होतो तसा अल्पोपहार झाला. श्री.बारगजे साहेबांनी पूजेचे पाठविलेले फोटो पाहून पुन्हा आवर्जून कौतुकासाठी फोन केला तेव्हा माझेही बोलणे झाले.

माझ्यानंतर दिवसभरात तेथे आलेल्यांपैकी श्री.शिवाजी मिसाळ व श्री.अशोक जांभळे यांच्या एकत्रित झालेल्या उपस्थितीने जणू मनोरजंन कार्यक्रमाची कमतरताच भरून काढली. गप्पांच्या ओघात शाळतील धम्माल आठवणींनी हास्यमैफीलच तेथे भरल्याचे दत्ता साळी यांनी सांगितले.

महाप्रसादासाठी येतो असे सांगून प्रत्यक्षात सायंकाळी श्री.सुधाकर कपाळे यांनी उत्सवाला भेट दिली. कु.विराज जांभळे याने युवावर्ग उपस्थितीचे प्रतिनिधित्व केले.

याप्रसंगी सौ. कांचन प्रवीण साळी, श्री.हनुमंत कोळेकर व त्यांचे चिरंजीव श्री.अनिरुद्ध कोळेकर यांनीही दर्शनाचा लाभ घेतला. तसेच श्री.विजय वक्ते साहेबांनी फोनवर आयोजनाची प्रशंसा केली. प्रत्यक्षात हजर राहणे शक्य नसले तरी, चश्माघर हॉलमधील आणि थेट प्रक्षेपण उत्सव संकल्पनेचे अनेकांनी कौतुक केले. श्री.सुभाष कप्पे यांनी पुण्याहुन फोन करून शुभेच्छा दिल्या. श्री.घनश्याम सरोदे, सौ. व श्री. बाळकृष्ण बावधनकर, सौ.उमा पोकळे, सौ.मंगल अष्टेकर या उत्सव मंडळ प्रतिनिधींनी शुभेच्छा दिल्या. जेष्ठ ज्ञातिबांधव श्री.दिपक साळी व त्यांचे बंधु श्री.अरुण साळी, श्री.दिलीप जाळींद्रे, सौ.स्नेहा प्रीतम ढोरे, भाजपचे माहिम विधानसभा उपाध्यक्ष श्री.जितेंद्र साळी, शिवसेना नेते श्री.भरत मते व सौ.अश्विनी मते या मान्यवरांनीही उत्सव उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. दुकानात उत्सव साजरा केल्यामुळे आपले आराध्य दैवत श्री जिव्हेश्वरांविषयी अनेकांनी कुतूहलाने माहिती करून घेतली व दर्शन आणि प्रसाद घेतला. यामध्ये श्री.किशोर मेहेर व श्री.संतोष पवार यांचा समावेश होता.

काळाच्या ओघात यंदा अपरिहार्यतेने आपल्या समस्त साळी समाजाला आपल्या आराध्य दैवताचा, श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव घरीच साजरा करावा लागला. काही उत्सव मंडळांनी प्रगत विज्ञानाच्या आधाराने समाज माध्यमांचा उपयोग करून घरी राहुनही ज्ञातीजनांस उत्सवात सक्रिय केले. दत्ता साळी यांनी केलेल्या या अश्या नवउत्सवाचे मनःपूर्वक कौतुक व अभिनंदन !

**- लक्ष्मण दत्तात्रय सरोदे**

कै. शंकर गोपीनाथ हर्णेकर आणि कै. लक्ष्मीबाई शंकर हर्णेकर, हर्णे यांच्या स्मरणार्थ
श्री. कमलाकर शंकर हर्णेकर आणि सौ. महानंदा कमलाकर हर्णेकर, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान १४

## श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव २०२० वृतांत उल्हासनगर



१ ऑगस्ट २०२० ला जिव्हेश्वर जन्मोत्सव आपआपल्या घरी साजरा करण्याचे ठरवले होते, परंतु ३१ जुलै २०२० तातडीची सभा घेण्यात आली. त्यामध्ये हे कुमारी प्रतिक्षा सतीश क्षिरसागर हिने आपण श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव आमच्या दुकानात साजरा करु या आणि त्याचे प्रात्यक्षिक गुगल मॅपद्वारे सर्व समाज बांधवांच्या घरोघरी पोहोचवू या असे सुचवले, यास सर्व सभासदांनी बहुमतांनी मान्यता दिली. जिव्हेश्वर जन्मोत्सवाची तयारी करण्यासाठी झोकून दिले. १ ऑगस्ट २०२० ला सकाळी भगवान श्री जिव्हेश्वरच्या पोथीचे वाचन डॉ.किसनराव ज. जेधे यांनी केले. नंतर सर्वांनी आरती केली व पाळणागीत गायले. यानंतर कु.सोनाली अ. दाहोत्रे आणि कु.प्रीती अ. दाहोत्रे यांची "नोटरी पब्लिक" म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल गौरव करण्यात आला, सर्वांनी आपले मनोगते सादर केली. सचिव श्री.मंगेश वि. कनोजे, खजिनदार श्री.विजय म. कांदेकर, सल्लागार श्री.यशवंत म. भदिर्गे, सल्लागार श्री.सतीश र. क्षीरसागर, कार्यकारी सदस्य डॉ.किसनराव ज. जेधे या सर्वांनी भाषणं केली त्यानंतर भगवान श्री जिव्हेश्वर यांच्यासाठी दाहोत्रे परिवाराकडून नैवेद्य व प्रसाद देण्यात आले. कु.प्रतिक्षा सतीश क्षीरसागर हिने सूत्र संचालन आणि जिव्हेश्वर जन्मोत्सवाच्या गुगल मॅपद्वारे चलचित्र प्रसारित केले कु. प्रतिक्षा स. क्षीरसागर हिने ज्ञाती बांधव आणि मान्यवरांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली यानंतर अल्पोपहार देण्यात आला. त्यानंतरही भाविक बांधवांनी दिवसभरामध्ये श्री.सतीश र. क्षीरसागर यांच्या दुकानांमध्ये येऊन श्री जिव्हेश्वर दर्शनाचा लाभ घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. किसनराव ज. जेधे, श्री.यशवंत म. भदिर्गे, श्री.सतिश र.क्षीरसागर, श्री. श्याम बा. चौधरी, श्री.विजय म. कांदेकर, श्री.पुरुषोत्तम ज. साळी, श्री.मंगेश वि. कनोजे, कु. प्रतिक्षा स. क्षीरसागर, सौ.चित्रा य. भदिर्गे, सौ.पल्लवी मं. कनोजे तसेच इतर कार्यकर्ते व महिला मंडळाचे सहकार्य लाभले.

।।जय जिव्हेश्वर।।

**- सचिव, श्री. मंगेश वि. कनोजे**

## विणकर दिन २०२० बृहन्मुंबई स्वकुळ साळी समाज



समस्त ज्ञातिबांधव-भगिनी, सप्रेम नमस्कार ! जय जिव्हेश्वर !

प्रतिवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून आपल्या देशात साजरा केला जातो. वस्त्रोद्योगाला चालना आणि विणकरांचा सन्मान यासाठी हा दिवस महत्वाचा आहे. मानवाच्या प्रमुख गरजांमध्ये वस्त्राचा समावेश आहे आणि वस्त्र निर्माण करणारे भगवान श्री जिव्हेश्वर हेच आपल्या ज्ञातीचे आराध्य दैवत आणि वस्त्र निर्मिती हाच आपल्या परंपरेचा श्रेष्ठ वारसा. म्हणूनच विणकर दिन म्हणजे आपल्या साळी समाजाने अभिमानाने मिरवावा असा दिवस. प्रतिवर्षी उत्साहाने साजरा केला जाणारा हा दिवस यंदाही आमच्या उत्सव मंडळाच्या वतीने संपन्न झाला. सर्व उपस्थितांनी श्री जिव्हेश्वर पुजन आणि हातमाग प्रतिमेच्या सुशोभन व पूजेत सहभाग घेतला. सर्वांना पेढे वाटून आनंद साजरा केला. कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर एकत्र येऊन मोठ्या प्रमाणात विणकर दिन साजरा करणे अशक्यच होते. मात्र मंडळाचे मा.सचिव श्री.दत्ता साळी यांनी पुढाकार घेऊन व सर्व खर्च पुरस्कृत करून त्यांच्या चश्माघर ह्या व्यवसायाच्या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्राप्त परिस्थितीत रितसर आमंत्रणाशिवाय मंडळाच्या वतीने सर्वांना कार्यक्रमाविषयी केवळ सूचीत केले गेले होते. केवळ सामाजिक बांधिलकी व आत्मियता जपत या कार्यक्रमाला ज्ञातीबांधव-भगिनींची चांगली उपस्थिती लाभली हे समाधान देणारे होते.

मुंबई विभाग स्वकुळ साळी (विणकर) समाज महासंघाचे अध्यक्ष श्री.भास्कर चौधरी याप्रसंगी उपस्थित होते. तसेच जेष्ठ ज्ञातिबांधव श्री.चंद्रकांत उगले, सौ.सुधा उगले, श्री.हरीष अष्टेकर, सौ.कांचन दत्ता साळी, श्री.रोहन साळी, श्री.लक्ष्मण सरोदे, श्री.शिवाजी मिसाळ, श्री.प्रवीण साळी, सौ.कांचन प्रवीण साळी, श्री.बाळकृष्ण बावधनकर, सौ.राधिका बावधनकर, श्री.अशोक जांभळे, श्री.अमोल गणेश टण्णु, श्री.गणेश टण्णु, श्री.हनुमंत कोळेकर व श्री.राजन साळी हे समाजबांधव उपस्थित होते. मंडळाच्या या उपक्रमाला अध्यक्ष श्री.शिवराम बारगजे, श्री.सुभाष कप्पे, श्री.सुधाकर कपाळे व श्री.घनश्याम सरोदे यांनी श्री.दत्ता साळी यांच्याशी संपर्क साधून शुभेच्छा व्यक्त केल्या.

**वार्तांकन - लक्ष्मण दत्तात्रय सरोदे**

कै. श्रीमती पार्वतीबाई महादेव दुर्गुळे, कुडली यांच्या स्मरणार्थ

श्री. विठोबा महादेव दुर्गुळे व सौ. विलासीनी विठोबा दुर्गुळे, भिवंडी यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## भगवान जिव्हेश्वर जयंती उत्सव, रायगड

भगवान जिव्हेश्वर जयंती उत्सव रायगडात उत्साहात कोरोनाच्या पार्श्वभुमीवर साध्या पध्दतीने सोहळा अनघा मोडक यांच्या विचारमंथनाने सर्व समाज मंत्रमुग्ध. महाड रघुनाथ भागवत ठराविक समाज बंधु-भगिनींच्या उपस्थितीत समाजभगिनी महिला पुरोहिता सौ.सुनिता आंबुर्ले यांच्याद्वारे विधिवत पुजा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.श्वेता आंबुर्ले यांच्या हस्ते करून कोरोनाच्या पार्श्वभुमीवर अगदी साध्या पध्दतीत रायगड जिल्हा स्वकुळ साळी मंडळ मुंबईच्या वतीने संस्थेच्या मुलुंड येथील कार्यालयात सकाळी ६:२० वा. भगवान जिव्हेश्वर जयंती सोहळा संपन्न झाला. त्यावेळी मंडळाचे मुख्य सल्लागार मा.चंद्रकांतजी हावरे मंडळाचे. पदाधिकारी श्री.अविनाश साळी, नंदकिशोर कोळेकर, प्रदीप शिपूरकर, अजित साळी, राम वैद्य अरूण साळी, नरेंद्र आंबुर्ले, सुरेश तिगडे, परशुराम डोईफोडे व सौ.संगिता साळी उपस्थित होते. जन्मकाळ सोहळा यशस्वीपणे पार पडण्यासाठी श्री.अजित साळी, सुरेश तिगडे, प्रदीप शिपुरकर यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच अनेक समाजबांधवांनी आपआपल्या निवासस्थानी जिव्हेश्वरांच्या प्रतिमेचे मनोभावे पुजन करून जयंती सोहळा साजरा केला. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजनांच्या अधीन राहून रायगड जिल्हा स्वकुळ साळी सेवा मंडळ मुंबईचे अध्यक्ष अविनाश साळी व सर्व कार्यकारिणींनी यावर्षी साध्या पध्दतीने भगवान जिव्हेश्वर जयंती सोहळा साजरा करण्याचे ठरवले आणि त्याचे तंतोतंत पालन करून मुलुंड येथील संस्थेच्या कार्यालयात मोजक्या समाजबांधवाच्या उपस्थितीत जन्मोत्सव सोहळा साजरा करून सोहळ्याच्या सर्व समाजबांधवांना लाभ घेता यावा म्हणून झूम ॲपच्या माध्यमातून लाईव्ह दाखवण्याचे प्रयोजन केले होते. याचा लाभ शेकडो समाजबांधवांनी घेतला. जयंती सोहळा पार पडल्यावर सांस्कृतीक कार्यक्रमांच्या वेळी मंडळाचे अध्यक्ष श्री.अविनाश साळी यांनी समाजबांधवांना संबोधित करताना लॉकडाऊनच्या दरम्यान आणि निसर्ग चक्रीवादळाने दिलेल्या तडाख्यात प्रभावित झालेल्या नुकसानग्रस्त समाजबांधवांना दिलेल्या आर्थिक सहाय्याचा तपशील दिला. तसेच सर्व समाजबांधवांनी दिलेल्या आर्थिक सहकार्याबद्दल आभार मानले. जिव्हेश्वर जयंती सोहळ्याचे औचित्य साधुन सुप्रसिध्द निवेदीका कुमारी अनघा मोडक यांनी अंथरूण ते उंबरठा या विषयावर झुमच्या माध्यमातून सर्व समाजबांधवांच्या सहभागात विचारमंथन केले व अनेक अडचणी, संकटे यांच्यावर मात करणाऱ्या विविध योध्दांची उदाहरणे देऊन उत्कृष्ट समाज प्रबोधन केले. समाजभगिनी डॉ.सौ.प्रज्ञा हावरे-नरे, डॉ.सौ.शिल्पा कोळेकर-एक्के यांचे आरोग्य विषयक मार्गदर्शन, सौ.प्रणिता शिपूरकर यांचे चित्रकलेतील वन स्ट्रोक प्रात्यक्षिक, कोविड योध्दांचा गौरव आणि दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा तसेच मनोरंजनात्मक विविध कलागुणांना साक्ष ठेवुन आगळावेगळा कार्यक्रम समाजबांधव श्री.राजेश तांबडे यांची संकल्पना असलेला सांस्कृतिक कार्यक्रम डिजिटल संगीत रजनी समस्त भारत देशातील आपल्या समाज बांधव-भगिनींना युट्युबच्या माध्यमातून दाखविण्यात आला. या सांस्कृतिक कार्यक्रमाची पुर्ण धुरा श्री.राजेश तांबडे आणि त्यांच्या टिमने नियोजन पध्दतीने राबविल्यामुळे कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. त्याचाही शेकडो समाजबांधवांनी पुरेपुर लाभ घेतला. एकंदर दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि समाज बांधवांच्या मोठया उपस्थितीत साजरा होणारा भगवान श्री जिव्हेश्वर जयंती उत्सव यावर्षी मात्र कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता साध्या पध्दतीने साजरा केलेल्या उत्सवाला चांगला प्रतिसाद लाभला. संस्थेचे अध्यक्ष अविनाश साळी व सर्व कार्यकारिणीने कोरोना महामारीत देखील योग्य नियोजन करून पार पडलेल्या सोहळ्याचे समाजाच्या सर्व स्तरावर भरभरून कौतुक होत आहे.

**- वृत्त संकलन**
**-रघुनाथ भागवत, प्रसिध्द प्रमुख**
**रा.जि.स्व.सा.से. मंडळ**

## श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव २०२० डोंबिवली

डोंबिवली साळी समाजाचा भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव कोरोना महामारी व सरकारच्या कडक नियमावलीमुळे एकत्र येणे शक्य नव्हते. शिवाय सोसायटीचे नियम ही होते, त्यामुळे कुणाच्या घरी जन्मोत्सव निमित्त जमणे नाही, म्हणून कमिटी मेंबर्सची मिटींग घेऊन असे ठरले की ग्रंथ वाचन व जन्मोत्सव आपापल्या घरीच साजरा करायचा आहे. श्री. अरूण एडके, श्री. चोपडे, श्री. राजेश साळी, श्री. सोमनाथ कासटकर, सौ. कालिंदी किचंबरे, सौ.मंजुषा मंद्रे आदींनी घरीच राहूनच साजरा केला व फोटो डोंबिवली साळी समाज ग्रुप वर टाकण्यात आले. शंभर वर्षाच्या इतिहासात प्रथमच एकत्र न येता सण साजरा करावा लागतोय. काळ कुणासाठी थांबत नाही. हे ही दिवस जातील. परत नव्या जोमाने सुरूवात करू. नवीन योजना. नव्या कल्पना घेऊन. तो पर्यंत आपली आणि कुटुंबियांची काळजी घ्या. जमेल तेवढी आपण समाजाचं देणं लागतो या भावनेतून मदत करत रहा. धन्यवाद.

---

## श्री जिव्हेश्वर उत्सव, ठाणे

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज अध्यक्ष श्री.विनोद सजगुले यांच्या घरी १ ऑगस्ट २०२० श्रावण शु.त्रयोदशी या दिवशी श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव मोठया आनंदात साजरा झाला. जागतिक संकटाचा विचार करता जिल्हाध्यक्ष श्री.सजगुले यांनी सकाळी ६ वाजून २० मिनीटाने सपत्निक जिव्हेश्वर पूजन व पोथीवाचन केले. सामाजिक अंतराचा विचार करता दिवसभरात बऱ्याच समाजबांधवांनी जिव्हेश्वर दर्शन घेतले. श्री.देवेन क्षीरसागर, सौ.प्रतीक्षा बोर्डे, श्री.प्रसाद बोर्डे, श्री.जयंत निचळ, श्री.विजय गोंधळेकर, श्री.शशीकांत डहाके तसेच श्री.प्रताप सरोदे यांनी सहकुटूंब जिव्हेश्वर पूजन केले.

श्री जिव्हेश्वर पुजनाबरोबरच माता अंकिनी व माता दशांकिनी यांच्या प्रतिमाचे पूजन केले. श्री.विनोद सजगुले यांनी सुंठवडा व प्रसादाची व्यवस्था केली होती.

- श्री. विनोद सजगुले

## श्री जिव्हेश्वर उत्सव वृत्तांत, बदलापूर



प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही बदलापूरमध्ये १-८-२०२० शनिवार रोजी श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव नेहमीच्याच उत्साहात परंतु यावर्षी घरोघरी साजरा करण्यात आला. यावर्षीच्या श्री जिव्हेश्वर उत्सवावर कोविड १९ या जीवघेण्या साथीचे सावट असल्याने भारत सरकारच्या आचारसंहिते नुसार हा उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यावर निर्बंध आले होते.

तदनुषंगाने अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज आणि ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज यांनी केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन बदलापूरमध्ये यावर्षी श्री जिव्हेश्वर उत्सव सार्वजनिकरीत्या साजरा न करता कार्यकारिणीचे पदाधिकारी व समाजबंधुभगिनींनी आपापल्या घरी साजरा केला. तत्पुर्वी याबाबत बदलापूरातील समस्त समाजबंधु भगिनींना विविध माध्यमातून अवगत करण्यात आले होते. त्यांस सर्वांनी संमती देऊन यावर्षी श्री जिव्हेश्वर उत्सव भगवान जिव्हेश्वरांची विधिवत पूजा, आरती आणि पोथीवाचन करून घरोघरी साजरा करण्यात आला.

**अध्यक्ष- विकास मधुकर वखारे,**
**स्वकुळ साळी समाज, बदलापूर**

---

## श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव, अमळनेर

अमळनेर येथील जिव्हेश्वर मंदिरात जिव्हेश्वर जयंती निमित्ताने अमळनेर येथील साळी समाज अध्यक्ष प्रताप साळी माजी नगरसेवक व सौ.संगीता प्रताप साळी माजी नगरसेविका अमळनेर जिव्हेश्वर जयंतीनिमित्त भगवान जिव्हेश्वर यांची पूजा केली.

कै. श्री. तुकाराम रामचंद्र वखारे (वडील), कै. श्रीमती सुलोचनाबाई तुकाराम वखारे (आई) व कै. श्री. सुभाष तुकाराम वखारे (भाऊ) यांच्य स्मरणार्थ श्री. सुरेश तुकाराम वखारे (अहमदनगर) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव, एरंडोल



एरंडोल येथे श्री.पंडित साळी अध्यक्ष साळी समाज एरंडोल, उपाध्यक्ष जळगांव जिल्हा समाज यांचे निवासस्थानी सहा वाजता भगवान श्री जिव्हेश्वरांचा जन्मोत्सव सोहळा पोथी वाचून श्री.पंडीत साळी, ललीता साळी, श्री.अतुल साळी, सौ.भावना अतुल साळी, श्री.मिलींद साळी, चिरंजीव ओम अतुल साळी यांनी भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव अध्याय सुमधुर स्वरात वाचन केले भगवान जिव्हेश्वराची आरती ओवाळू न, आरती गाऊ गं,मंगलमय, स्वानंदे टाळया वाजवून आरती म्हटली गायली प्रसंगी सौ.ललिता साळी, अनुष्का साळी यांनी श्री.अतुल साळी, मिलिंद साळी यांनी लाइटिंगची व रांगोळीची उत्तम रोषणाई करून वातावरण प्रसन्न व उत्साहित केले. नंतर तीर्थ प्रसाद जिव्हेश्वराला अर्पण करून सर्वांनी प्राशन केला दुपारी मिष्ठान्न सर्वांनी लाभ घेतला सायंकाळी भगवान श्री जिव्हेश्वरांची आरती भजन भक्ती गीत गाऊन वातावरण मंगलमय केले इतिश्री भगवान श्री जिव्हेश्वर सोहळा अध्यक्ष यांचे निवासस्थानी संपन्न झाला.

**- श्री. पंडीत साळी**

## श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव, जळगांव



आज दि.१-८-२०२० रोजी सृष्टीचे प्रथम वस्त्र निर्माते आणि आपल्या साळी समाजाचे आद्यदैवत श्री भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव पण यावर्षी आपल्या देशावर कोरोना संकट असल्यामुळे सर्व साळी समाजबांधवांनी आपआपल्या घरी अगदी साध्या पध्दतीने घरगुती वातावरणात जन्मोत्सव साजरा केला. आम्ही जन्मोत्सवादिवशी माझी आई ग.भा.उषा गजानन साळी यांनी श्री जिव्हेश्वरीचे वाचन करून सकाळी आम्ही ६:१० मि. श्री भगवान जिव्हेश्वराच्या प्रतिमेचे पूजन करून आपले आद्य दैवत श्री भगवान जिव्हेश्वर की जय असा जयघोष करून आम्ही आमच्या सर्व परिवारातर्फे प्रार्थना केली आपल्या देशाला कोरोना मुक्त करून सर्व अन्नधान्यासाठी पावसाच्या रुपात मानवासाठी सेनिटायझर आणि शेतीसाठी सुजलाम सुफलाम अशी प्रार्थना केली.

**- श्री.सुधीर गजानन साळी**
**उपाध्यक्ष श्री.जिव्हेश्वर युवक मंडळ जळगांव.**

**स्वकुळ समाचार ही ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज ह्या सरकारमान्य नोंदणीकृत संस्थेची पत्रिका आहे. त्या नावाचा कुणीही गैरवापर करू शकत नाही. तसे केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

**अध्यक्ष - श्री. विनोद सजगुले**
**सेक्रेटरी - श्री.राजेश साळी**
**संपादक - श्री.गोपाळ थोरात**



श्री भगवान जिव्हेश्वर जन्म उत्सव सकाळी ६:०० वाजता जिव्हेश्वर युवक मंडळ जळगावचे सचिव श्री.दिलीप आखडकर यांच्या निवासस्थानी करण्यात आले व त्यानंतर भगवान जिव्हेश्वरांची पोथी वाचन श्री.पद्माकर आखडकर यांनी केली व त्यानंतर भगवान जिव्हेश्वरांच्या जयंती निमित्त सर्व समाज बांधवांना फोन व फेसबुकने शुभेच्छा दिल्या.



जय जिव्हेश्वर साळी समाजाचे आद्य दैवत व सृष्टीचे वस्त्रनिर्माते भगवान श्री जिव्हेश्वर जन्म उत्सव या वर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे घरोघरी करण्यात आला. श्रावण शुध्द त्रयोदशी शनिवारी सकाळी ६:०० वाजता जिव्हेश्वर युवक मंडळ जळगावचे जेष्ठ सल्लागार श्री.रमेश रामदास खंडारे तसेच सहसचिव श्री.किशोर रमेश खंडारे यांच्या निवासस्थानी भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव मंगलमय वातावरणात उत्सवात साजरा करण्यात आला आणि भगवान जिव्हेश्वरांच्या पोथीचे वाचन करण्यात आले व त्यानंतर भगवान जिव्हेश्वरांच्या जयंती निमित्त सर्व समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.



### श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव, जळगांव

जळगाव येथील महिला मंडळाच्या अध्यक्ष सौ. पुष्पलता रवींद्र माधवराव साळी यांचे निवासस्थानी अत्यंत घरगुती स्वरूपात भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव रवींद्र साळींनी पोथी वाचून संपन्न केला .आरती व पाळणा महिलांनी गायीला .तीर्थ प्रसाद सर्वांनी प्राशन केला. रांगोळी सजावट पुष्पहार महिलांनी घातला जन्मोत्सव संतोष रवींद्र साळी सौ. अंकिता संतोष , दिपक, वसंत साळी, श्रीमती सुलभा साळी, सौ पुनम दीपक ,विजय वसंत ,कु.भक्ती चिरंजीव विवेकानंद दीपक,चि. प्रथम आदीं कुटुंबीयांनी जन्मोत्सवात सक्रिय सहभाग घेतला व भगवान जिव्हेश्वर उत्सव साजरा करण्यात आला. व जगास कोरोनामुक्त करण्याचे साकडे घालण्यात आले इतिश्री जन्मोत्सव घरगुती पद्धतीने संपन्न.

## हार्दिक अभिनंदन!

ठाणे शहरातील रहिवासी श्री. राजू आणि सौ. मोहिनी इंगळे (सध्या वास्तव्य सिंगापूर) यांची सुकन्या आकांक्ष्या हिला केंब्रिज असेसमेंट इंटरनॅशनल स्कूलच्या परिक्षेत फिजिक्स, इंग्लिश, गणित, केमिस्ट्री, ग्लोबल परस्पेक्टिव्ह आणि इंग्लिश लिटरेचर या विषयात ए ग्रेड आणि International cert. of Education या विषयात Distinction असे उत्तुंग यश मिळाल्याबद्दल कु.आकांक्षाचेठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार तर्फे हार्दिक अभिनंदन !

कै. तुकुबाई नागप्पा टोणपे (आई), कै. नागप्पा दामोदर टोणपे (वडील) व कै. दामोदर नागप्पा टोणपे (बंधू), सोलापूर यांच्या स्मरणार्थ श्री. मोहन नागप्पा टोणपे, वडाळा - मुंबई यांच्या सौजन्याने पृष्ठदान

# उपवर मुलींची नावे

## १) कु. प्रांजल



ज. ता. २१/३/९१,
ज. वेळः सकाळी ८.३७
ज. स्थळः नाशिक

रासः वृषभ, नाडीः अंत्य, नक्षत्रः कृतिका, गणः राक्षस, चरणः ४थे, उंचीः ५'३'',
रक्तगटः O+, वर्णः गोरा, शिक्षण : B.Com, DTL, MPM-HR, DLW & LL, G. D. C. & A. ,
नोकरीः Panchvati Automobile Pvt. Ltd. Nashik as a HR Manager
अपेक्षाः अनुरुप

पत्ताः **श्री. शरद राणोजी साळी**
फ्लॅट ६, अनुराधा अपार्टमेंट, प्रमोद नगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३
मोबा.: ७५८८७०६९१३/९४२२७३०७११

-(१२/२०)

## २) कु. स्नेहल



ज. ता. ११/१/८९,
ज.वेळः दुपारी ४.०४
ज. स्थळः ठाणे

रास : कुंभ, नक्षत्र : शततारका, नाडीः आद्य, गण : राक्षस, चरणः३रे, उंचीः ४'११'', वर्णः गव्हाळ,
रक्तगटः O+, शिक्षणः बी. कॉम. डि. एफ. एम.
नोकरीः अंबरनाथ, मा. प्रा.: १२,०००/-
अपेक्षा- सुशिक्षित, निर्व्यसनी
पत्ता : **श्री. दिलीप माधवराव साळी (सिताफळे)**,
००६, साई स्मिता हौ. सोसा., महिला समिती शाळेजवळ, ठाकुर्ली (पूर्व)
मो.: ९९८७४९२८८५

-(९/२०)

## ३) कु. सिध्दी



ज. ता. ०२/१२/९७,
ज.वेळः पहाटे ३.३०
ज. स्थळः नाशिक

सौम्य मंगळ आहे
रासः धनु, नक्षत्र : मुळ (शांती केली आहे),
चरणः ३रे, गण : राक्षस, नाडीः आद्य,
उंचीः ५'२'', रक्तगटः O+,
शिक्षणः बी. कॉम.
अपेक्षाः अनुरुप, नाशिक-मुंबई स्थळांना प्राधान्य
पत्ता : **श्री. परिक्षित सुरेश बिडकर**,
घर नं.८५७, बागडपट्टी, अहमदनगर
मोबा.: ९४२२०८३८२१
९४२२७२७४६५/९५६१००४६४३
९८५०८५६६६२ (श्रीकांत शेरे-मामा) (७/२१)

## ४) कु. गायत्री



ज. ता. १६/०५/८९,
ज.वेळः दुपारी २.५५
ज. स्थळः पुणे

रासः कन्या, नक्षत्र : हस्ता, नाडीः आद्य,
चरणः १ले, गण : देव, उंचीः ५'१'',
रक्तगटः B+ वर्णः गव्हाळ, शिक्षणः M.Sc., B.Ed.
अपेक्षाः अनुरुप, मुंबई जवळील

पत्ता : **श्री. गणेश विश्वेश्वर टण्णू**
भुवनेश्वर बिल्डींग, ४/४२५, परेल गाव, परेल मुंबई - ४०००१२
मोबा.: ९८६९६९४०९७

-(९/२०)

## ५) कु. सोनल

**ज. ता. १३/२/९२, ज.वेळः रात्री ३.५०, जन्म स्थळः कांदिवली**
रासः वृषभ, नक्षत्रः रोहिणी, नाडीः अंत्य, चरणः २रे, गणः मनुष्य,
उंचीः ५'०'', वर्णः गोरा, शिक्षण : एम.ए. (मराठी), डी.एड.
नोकरीः शिक्षिका इंग्रजी मिडियम,
अपेक्षाः अनुरुप
पत्ताः **श्री. रविंद्र पंढरीनाथ साळी**
टोपाझ, ए विंग, रुम नं. जी-४, एव्हरशाईन रोड, मिरारोड (पूर्व)
मोबा.: ८०९७२५८३६१ / ८०९७६१९८०४

(१०/२०)

## ६) कु.वृषाली



ज. ता. १/५/९५,
ज.वेळः सकाळी १०.००
ज. स्थळः अमळनेर

रास : वृषभ, नक्षत्र : कृतिका,
गणः राक्षस, नाडीःअंत्य, उंचीः५'२'', वर्णःगोरा
शिक्षणः एम. बी. ए.
नोकरीः खाजगी कंपनी, वा. प्रा.: ३ लक्ष
अपेक्षा : सुस्थापित, उच्चशिक्षीत

पत्ता : **श्री. प्रफुल्ल साळी**
२०१, अन्नपूर्णा कृपा, नांदीवली रोड, डोंबिवली (प)
मोबा.: ९३२६६२०३३०/९३२३०८६९४७

-(१०/२०)

## ७) कु. शिवानी



ज. ता. ०५/१२/९४,
ज. वेळः दुपारी १.५५
ज. स्थळः अहमदनगर

रास : धनु, नक्षत्र : पुर्वाषाढा,
नाडीः मध्य, चरणः ३रे, गण : मनुष्य,
वर्णः गोरा, उंची : ५'४'', रक्तगटः O+
शिक्षणः बी. ई. (आय. टी.)
नोकरी : मुंबई येथे,
अपेक्षा : उच्चशिक्षित / बी.ई.
पत्ता : **श्री. प्रविण खेमचंद साळी**
बी-५, साईश्याम प्लाझा हौ. सोसायटी, कात्रप हायवे, बदलापूर (पूर्व) जि. ठाणे - ४२१५०२
मोबा.: ८८७९७८५३४६/९८६०७३४४१९

-(११/२०)

## ८) कु. निशिगंधा



ज. ता. २२/०१/९३,
ज. वेळः ११.५८
ज.स्थ.: माणगाव(रायगड)

रास : मकर, नक्षत्र :उत्तराषाढा, नाडीः अंत्य,
चरणः ३रे, गण : मनुष्य,उंची : ५'२'',वर्णः गोरा,
रक्तगटः O+, शिक्षणः Master of Computer Application, नोकरीः Accenture Technologies Pvt. Ltd., वा.प्रा.: ९.५ लक्ष,
अपेक्षा : अनुरुप, निर्व्यसनी, उच्चशिक्षित, आयटी मध्ये नोकरी करणारा, मुंबई-नवीमुंबई-ठाणे प्राधान्य

पत्ता : **श्री. लवकुमार गोपाल धोत्रे**
श्री जी रेसिडेन्सी, अे-८०२, पारसिकनगर, खारेगाव, कळवा ४००६०५.
मो.: ९९८७१४६०९७ / ९८२०८८८४१७

-(११/२०)

कै. केशवराव मलकाजी धोत्रे, मुंबई यांच्या स्मरणार्थ
७ श्री. गुरुनाथ मलकाजी धोत्रे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

कै. सुर्यकांत (भाई) गोपीनाथ भागवत, मुलुंड यांच्या स्मरणार्थ
श्रीमती सुप्रिया सुर्यकांत भागवत, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.
२४

**९) कु. मुग्धा (घटस्फोटीत)**

**ज. ता. ३१/५/८८, ज.वेळः सकाळी ९.२५, जन्म स्थळः पुणे**
रासः वृश्चिक, नक्षत्रः अनुराधा, नाडीः मध्य, चरणः ३रे, गणः देव, उंचीः ५'१'', वर्णः गोरा, रक्तगटः O+, शाकाहारी, शिक्षण : बी. ई. (ई अँण्ड टी. सी.), नोकरीः कंपनी रत्नांगिरी, मा.प्राः २०,०००/-, अपेक्षाः सुस्थापित
पत्ताः **डॉ. पुरुषोत्तम प्रल्हादराव काजवे**
थीबा पॅलेस रोड, रत्नांगिरी - ४१५६१२ मोबा.: ९४२२६३१०८७
(१०/२०)

**१०) कु. सायली**

**ज. ता.:२५/०२/१९८८, ज.वेळःरात्रौ १०.५५, ज.स्थळःकल्याण,**
रासः वृषभ, नक्षत्रः मृग, चरणः २रे, नाडीः मध्य, गणः देव, योनीः सर्प, उंचीः ५'०", वर्णः गव्हाळ, रक्तगटः अेबी+ve, शिक्षणः बी.कॉम., एम.बी.ए. (फायनान्स), नोकरी : डोंबिवली येथे सी.ए. च्या ऑफिस मध्ये. अपेक्षाः उच्चशिक्षित, शाकाहारी प्राधान्य.
**पत्ताः श्री.सुहास प्रभाकर दळवी (वडील)**
१५, लावण्य सोसायटी, स्टेट बँकेच्या मागे, मुरबाड रोड, कल्याण (प.) ४२ ३०१.
मो.: ९७६९७४४५४१ / ९८३३४१४७७६ (७/२१)

**११) कु. स्वाती**



**ज. ता. १८/९/९२, ज.वेळः दुपारी १२.१२ ज. स्थळः मुंबई**

रास : वृषभ, नक्षत्र : रोहिणी, गणः मनुष्य, नाडीः अंत्य, उंचीः५'२'', शिक्षणः बी. एम. एस.-सी. एस. करीत आहे, नोकरीः अंधेरी (पूर्व) येथे
अपेक्षा : अनुरुप, मुंबई-ठाणे स्थळांना प्राधान्य
पत्ता : **श्री. काशिनाथ पांडुरंग माळवदकर,**
विनी हाईटस, सी विंग, रुम नं. ००८, लक्ष्मीबेन छेडा मार्ग, नालासोपारा(पश्चिम) जि. पालघर - ४०१ २०३
मोबा.: ८१०८४४१५४७/ ९३२१३८९२२८ -(११/२०)

**१२) कु. अमृता**



**ज. ता. ६/५/९१, ज.वेळः दुपारी १.३५ जन्म स्थळः मुंबई**

रासः मकर, नक्षत्रः श्रवण, चरणः २रे, नाडीःअंत्य, गणः देव, वर्णः सावळा, उंचीः ५'५ शिक्षण : बी. एस. सी. (आय.टी) एम. सी. ए. करीत आहे, नोकरीः केप जेमिनी (असोसीएट कन्सलटंट) अपेक्षाः सुशिक्षित, सहकार्यदक्ष

पत्ताः **उषा मनोहर साळी**
३/३५, ५० टेनामेंट, जी. डी. आंबेडकर रोड, परेल-भोईवाडा, मुंबई - ४०० ०१२
मो. : ७७१५०६०६५४/८०८२४७९१२६ -(९/२०)

**१३) कु. अक्षता**



**ज. ता. १७/४/८८, ज.वेळः रात्री ९.४५ अहमदनगर**

रास : मेष, नक्षत्र : भरणी, उंचीः५'०'', वर्णःसावळा, शिक्षणः बी. कॉम,
नोकरीः ERU Learning Institute of Management as Programme Co-ordinator मा.प्रा.: ३८,०००/-,
अपेक्षा : अनुरुप
पत्ता : **श्री. एकनाथ दत्ताराम साळी,**
बी/७०४, दीप हाईट्स, यशवंत गौरव कॉम्पलेक्स, निळेमोरे, फनफिएस्टा सिनेमा पुढे, नालासोपारा (प), जि. पालघर
मो.: ९०२९५०९२९५/८१४९७०५०५६ -(११/२०)

**१४) कु. जयश्री**



**ज. ता. १९/१२/९३, ज.वेळः सकाळी ८.४५ ज.स्थळः नाशिक**

वर्णः निमगोरा, उंचीः ५"७
शिक्षणः बी. कॉम, एम.ए. (मराठी)
नोकरीः करसहाय्यक (जीएसटी कार्यालय) मालेगाव (महाराष्ट्र शासन)
मा.प्रा.: ३०,०००/-,
अपेक्षा : उच्चशिक्षित, सरकारी नोकरीस प्राधान्य, निर्व्यसनी
पत्ता : **श्री. संजय बाबुराव धरम,**
आडगाव म्हसरुळ लिंक रोड, म्हाडा बिल्डींग नं. १बी, प्लॉट नं. ४०४, नाशिक-१
मोबा.: ८९७५५०१६९६/९८९२७०२०९३ -(६/२१)

**१५) कु. पुजा**



**ज. ता. २३/८/९४, ज.वेळः दुपारी ३.३७ ज.स्थळः शहाड**

रास : मीन, नक्षत्र : गुरु, चरणः ४थे,गणःमनुष्य, उंचीः ५', शिक्षणः Diploma in civil Engg
नोकरीः Vescon Engg. PVT LTD (Billing Enginer)
अपेक्षाः अनुरुप,उच्चशिक्षित, मुंबई-पुणे स्थळांना प्राधान्य
पत्ता : **श्री. विष्णू आंबेकर**
रुम नं. २, ओमकार चाळ, मिलिंद नगर, आनंद दिघे शाळेजवळ, कल्याण (प) जि. ठाणे- ४२१३०१ मोबा.: ९८६७००८५६४ (वडील) ९१७२०५९७४४ (बहिण-सौ. रुपाली दिवटे) -(१०/२०)

**१६) कु. अश्विनी सुदाम साळी**

**ज. ता. २६/१०/९३, ज.वेळः दुपारी १.००, ज.स्थळः पारोळा**
रास : कुंभ, नक्षत्र : पुर्वाभाद्रपदा, नाडीः आद्य, चरणः १ले,गण :मनुष्य, उंचीः ५'२'', रक्तगटः O+, शिक्षणः बी. ई. (कॉम्प्युटर), नोकरीः मित्र लर्निंग एण्ड मिडिया प्रा.लि.,अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **कल्पना साळी**
रुम नं. ४, तळ मजला, दामिनी कॉम्प्लेक्स, मारुती, मंदिर मागे, पिंपळघर पाडा, कल्याण-भिवंडी रोड, भिवंडी - ४२१३११,
मो.: ९१५८६९७२९४ - (९/२०)

**१७) कु. राखी**



ज. ता. १२/०८/९२
ज. वेळ: पहाटे ४.०२
ज. स्थळ: सुरत

रास : मकर, नक्षत्र : श्रवण, नाडी: अंत्य,
गण : देव, उंची: ५'२'', वर्ण: गव्हाळ,
रक्तगट: A+,
शिक्षण: एम. कॉम. (ॲपियर),
अपेक्षा : अनुरुप, मुंबई स्थळांस प्राधान्य
**श्री. विकास एकनाथ साळी**
तुंगागाव, तारानगर, पवई, साकी विहार रोड,
अंधेरी (पूर्व) ४०० ०७२
मोबा.: ९०७६०४४८२६९/९८९२४५११६१
९६११९६२९७५० -(११/२०)

**१८) कु. स्नेहा**



ज. ता. ५/८/९५,
ज.वेळ: दुपारी ४.४५
ज.स्थळ: रेंदाळ

रास : वृच्छिक, नक्षत्र : अनुराधा, नाडी: मध्य,
चरण: १ले, गण : देव, वर्ण: निमगोरा
शिक्षण: बी. ई. (इलेक्ट्रिकल),
डिप्लोमा (इ. ॲण्ड टी.सी.)
अपेक्षा: अनुरुप, नोकरी/व्यवसाय
पत्ता : **श्री. मिलिंद राजाराम भोबेकर**
बी-२०, यशगृह संकुल, पाग, ता. चिपळूण,
जि. रत्नागिरी - ४१५६०५
मोबा.: ७५८८५४८८०६ (वडील)
७४०५६०६६३१ (आई) -(१०/२०)

**१९) कु. अनघा**



ज. ता. १६/६/९२
ज. वेळ: रात्री ८.०५
ज. स्थळ: डोंबिवली

रास : धनु, नक्षत्र : पुर्वाषाढा, नाडी: मध्य,
गण : मनुष्य, चरण:२रे, उंची: ५'५'', वर्ण: गोरा,
शिक्षण: एम. ई. (कॉम्प्युटर)
नोकरी: सिटीयस टेक प्रा. लि. एरोली,
वा. प्रा.: ५.५ लक्ष,
अपेक्षा: मुंबई-ठाणे स्थळांना प्राधान्य
पत्ता : **ॲड. विजय भिकाजी वैद्य**
एफ-२/१०१, गोविंद धाम सोसा., फेज-२,
जुना मुंबई-पुणे रोड, कळवा (प) ४००६०५
मो.: ९८६९१४०२६२/७९७७१३७७३० -(९/२०)

**२०) कु. सोनाली**



ज. ता. २३/१२/८७,
ज.वेळ: रात्री १०.०५
ज. स्थळ: अमळनेर

रास : मकर, नक्षत्र : श्रवण, चरण: ३रे,
गण: देव, नाडी: अंत्य, उंची:५'१'',
वर्ण: उजळ, शिक्षण: बी. कॉम.
अपेक्षा : अनुरुप
पत्ता : **श्री. अशोक त्र्यंबक डहाके**
फ्लॅट नं. १०२, भक्तीधाम अपार्टमेंट,
इंदिरा नगर, नाशिक - ४२२ ००१
मोबा.: ८३०८१२८४९९/९७६२५४११८५
९०२८९०१५५६/७३८३३२९११०(मामा)
Email: rahu.dake@yahoo.co.in -(९/२०)

# हार्दिक अभिनंदन!





आपल्या समाजातील जेष्ठ समाजकर्ते आणि शिवसेना उपविभाग प्रमुख मा.श्री.भरत मते साहेब तसेच आपल्या अ.म.स्व.सा.समाज महिला मंडळ अध्यक्षा व शिवसेनेच्या अहमदनगर महिला संपर्क प्रमुख मा.सौ.अश्विनीताई मते यांच्या प्रयत्नातून अहमदनगर येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ संचालित " श्री लक्ष्मी नारायण शिशु शिक्षण मंदिर" या शाळेच्या नियोजित इमारत बांधकामासाठी मा.आमदार व माजी मंत्री श्री.दिवाकरजी रावते यांच्या आमदार निधीतून 15 लाख रू.चा निधी उपलब्ध करून मिळालेला आहे.या बद्दल श्री.रावते साहेबांचे शतशः आभार तसेच श्री.मते साहेब आणि सौ.अश्विनीताई यांना खूप खूप धन्यवाद

जय जिव्हेश्वर



माजी परिवहनमंत्री मा.आ.दिवाकर रावते साहेब यांचे निधीचे पत्र अहमदनगर जिल्हा संपर्क प्रमुख मा.सौ.आश्विनी ताई व भरत मते साहेब यांचेकडून स्वीकारताना संजय सागांवकर , जितेंद्र लांडगे , कृष्णा बागडे व मुंबईतील मा चंद्रकांत हावरे भास्कर चौधरी अजित साळी समाज बांधव

# उपवर मुलांची नावे

**१) चि. प्रमोद**



ज. ता. १८/२/८८,
ज.वेळः
ज. स्थळः

रासः कुंभ, नाडीः आद्य,
गणः राक्षस, उंचीः ५'२'',
शिक्षणः बी. ई. (केमिकल)
नोकरीः नोकरी
मा.प्रा.ः २५,०००/- , अपेक्षाः अनुरुप
पत्ताः **श्री. सुधाकर श्रीधर तांबडे,**
शिवशारदा बिल्डींग, ८वा माळा, रुम नं. ७,
आनंद नगर, भांडूप (पश्चिम), मुंबई-४०००७८
मोबा.- ९८६९०७२८४०/प्रमोद-८८५०९९४९०५

-(१२/२०)

**५) चि. भारत**



ज. ता. १३/७/९२,
ज.वेळः स. १०.५७
ज. स्थळः अंबरनाथ

रासः धनु, नक्षत्रः मुळ, चरणः ३रे, नाडीः आद्य,
गणः राक्षस, उंचीः ५'९'', वर्णः सावळा (साधारण गोरा)
शिक्षणः बी. ए. एल. एल. बी., डी. सी. एल.
नोकरीः मुंबई उच्चन्यायालयात वकिल
मा.प्रा.ः ३५,०००/- , अपेक्षाः सुंदर,
उच्चशिक्षित, सुस्वभावी, नोकरी असल्यास उत्तम
पत्ताः **श्री. गोपाळ सुकलाल थोरात,**
घरकुल हौ. सोसायटी, घर नं. ५१७७, शिवाजी
नगर, मारुती मंदिरा जवळ, अंबरनाथ (पूर्व)
मोबा.ः ७७०९३१५४९८

-(११/२०)

**२) चि. किरण (घटस्फोटीत)**

**ज. ता. ४/१२/८२, ज.वेळः रात्रौ ९.१०, ज. स्थळः सुरत**

रासः वृच्छिक, नाडीः मध्य, गणः देव, वर्णः गोरा, उंचीः ५'३'',
शिक्षणः १२वी, आय. टी. आय., नोकरीः कोलगेट कंपनी, मार्केटींग
मा. प्रा.ः२५ ते ३०,०००/-, स्वतःचा फ्लॅट

अपेक्षा : अनुरुप
पत्ताः **श्री. भिकाजी रामचंद्र मेहेंद्रे,**
ई-७०३, शुभ वाटिका, कुरुद्वा रोड, डिंडोली, उधना, सुरत
मोबा.ः ०९२२८४३१६०५/०९०२९८०५१५४

(११/२०)

**६) चि. विक्रम**



ज. ता. १४/६/९०,
ज.वेळः सकाळी ११.४५
ज. स्थळः रामपाटण राजापूर

रासः कुंभ, नक्षत्रः घनिष्ठा, चरणः ४थे, नाडीः मध्य
गणः राक्षस, उंचीः ५'८'', रक्तगटः ओ+,
शिक्षणःएम. एस. सी.(केमिस्ट्री), पी.जी.डी.एम.एल.टी.
नोकरीः अपोलो हॉस्पिटल ॲण्ड आयव्हीएफ डि. बेलापूर
मा. प्राः ३५,०००/-, अपेक्षा : सुंदर, गृहकृतदक्ष,
पदवीधर, नोकरी असल्यास उत्तम
पत्ताः **श्री. विजयकुमार धोंडू तांबडे,**
११/बी२२, राधेशाम सी. एच. एस. म्हाडा कॉलनी
नवघर रोड, पूर्व द्रुतगती महामार्गा जवळ, मुलुंड
(पूर्व) मुंबई-८१, मो.ः ९०२१९१३३९४० /
९०१९६४४१८७

-(१०/२०)

**३) चि. मयुर**



ज. ता. ६/११/८६,
ज.वेळः सकाळी ०७.२०
ज. स्थळः अ. नगर

रास : धनु, नक्षत्रः मुळ (शांती केली आहे), गणः राक्षस,
नाडीः आद्य, चरणः ४थे, उंचीः ५'७'',
वर्णः गोरा, रक्तगटःO+, शिक्षणः बी. कॉम,हार्डवेअर
ॲण्ड नेटवर्क कोर्स, एम.एस सर्वर सर्टिफाईड
नोकरीः फ्युचर फोकस ईन्फोटेक प्रा. लि. (ट.सी.एस)
वा. प्रा.ः ५.३ लक्ष
अपेक्षाः अनुरुप
पत्ताः **श्री. शरद राणोजी साळी**
फ्लॅट ६, अनुराधा अपार्टमेंट, प्रमोद नगर,
गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३
मोबा.ः ७५८८७०६९१३/९४२२७३०७११ -(१२/२०)

**७) चि. प्रशांत**



ज. ता. १३/९/८९,
ज.वेळः पहाटे १.४५
ज. स्थळः जळगांव

रासः मकर, गणः देव, उंचीः ५'६'',
शिक्षणः बी. कॉम., एम. बी. ए. (फायनान्स)
नोकरीः – Aura Minerals Tz (East Africa)
मा.प्रा.ः १२०० डॉलर (रु. ८५,०००/-)
अपेक्षा : अनुरुप, परदेशात राहण्याची तयारी असावी

पत्ताः **श्री. सुनील बिसन साळी**
गट नं.५४, प्लॉट नं. ६, शिव कॉलनी, जळगांव,
मोबा.ः ९४२३९४९९७३/८१४९९४९९७३

-(१०/२०)

**४) चि. राहुल**



ज. ता. ३०/९/९१,
ज.वेळः दुपारी २.१५
ज. स्थळः बोरद (महा.)

रासः मिथुन, नक्षत्रः मृग, नाडीः मध्य, चरणः ४थे,
उंचीः ६'०'', रक्तगटः O+, शिक्षण : बी. टेक
(ईएक्सटीसी) एम.बी.ए. (फायनान्स),
नोकरीः टाईम्स ईन्टरनेट, नोयडा - बिझनेस
ॲनालिस्ट, वा. प्रा. : ६ लक्ष, अपेक्षाः अनुरुप,
उच्चशिक्षित, सुस्वभावी, नोकरीस प्राधान्य
पत्ता : **श्री. रविंद्र रामदास बोरदे,**
१, अभिनव कॉलनी, (निवाली रोड), सेंधवा,
जि. बडवानी (म.प्र.) ४५१६६६
मोबा.ः ९४२४५५०१४५/९००९८६४०२१
Email: raviborde1960@gmail.com

-(१०/२०)

**८) चि. राहुल**



ज. ता. २९/०९/८६,
ज.वेळः सायं. ०५.३५
ज. स्थळः तळोदा

रासः कर्क, नक्षत्रः आश्लेषा, नाडीः अंत्य,
गणः राक्षस, रक्तगटः B+
शिक्षणः एम.बी.ए.फायनान्स, (सी.एफ.ए.)
नोकरीः सिटी बँक-मुंबई, मा.प्रा.ः १.२ लक्ष,
अपेक्षा : बी.ई., उच्चशिक्षीत, अनुरुप

पत्ताः **श्री. राजेंद्र जाधव क्षिरसागर**
२०२, गोमी ॲव्हेन्यू सोसायटी, शिवाई नगर
बस स्टॉप जवळ, ठाणे ४००६०६
मो.ः ९८३३७५७५८२

-(९/२०)


कै. श्रीमती चंद्रभागाबाई कृष्णराव शेकटकर यांच्या स्मरणार्थ डॉ. सतिश कृष्णराव शेकटकर व सौ. संध्या सतिश शेकटकर यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

कै. द्वारकाबाई शामराव वैद्य (काळमेख) यांचे स्मरणार्थ श्री. व सौ. सुनंदा अभिमन्यु वैद्य (नाशिक) यांच्या सौजन्याने पृष्ठ दान.

**९) चि. महेश**



**ज. ता. १०/९/८८,**
**ज.वेळः सकाळी १०.२०**
**ज. स्थळः मुंबई**

रासः सिंह, नक्षत्रः मघा, चरणः ४थे,
गणःराक्षस, नाडीः अंत्य, उंचीः ५'५'',
वर्णः गव्हाळ, शिक्षणः M.Com, Pursuing C.A.
व्यवसाय : Tax Consultation (Handling Practice), वा.प्रा.: २.५ ते ३ लक्ष, अनुरुप
अपेक्षाः अनुरुप
पत्ताः **श्री. नागराज विठ्ठलराव एकबोटे**
ए-१५०१, जय भारत(एस.आर.ए.) को. ऑप. हौ. सोसा., गांधीनगर, लालजी पाडा, न्युलिंक रोड जवळ, कल्पवृक्ष हाईट्सच्या मागे, कांदिवली (प)
मोबा.: ९८६७११३१५४/९१४६४१३५३७
-(०२/२१)

**१०) चि. सुरेंद्र**



**ज. ता. २०/७/८२,**
**ज.वेळः रात्री १०.२५**
**ज. स्थळः मुलुंड**

रासः कर्क, नक्षत्रः पुनर्वसु, नाडीः आद्य,
गणः देव, चरणः ४थे, वर्णः गोरा, उंचीः ५'४''
शिक्षण : एम.बी.ए. (फायनान्स)
नोकरीः जे.एम.डी. मार्केटींग प्रा. लि.ईसुझु डिलरशिप (अकाऊंट मॅनेजर)
मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **श्री. रमेश शिवराम डोईफोडे,**
जाबुवंत हौ. सोसायटी, तळ मजला, बी विंग, रुम नं.५, सालासार नगर, पाटील पाडा, बदलापूर (पूर्व) ४२१५०३
मो.: ९८६७८१५७०३ / ९९६७०३७५४७
-(६/२१)

**११) चि. सनिल**



**ज. ता. २१/१०/९३,**
**ज.वेळः दुपारी ३.३०**
**ज. स्थळः दादर**

रासः धनू, नक्षत्रः पूर्वाषाढा,
गणः मनुष्य, उंचीः ५'७'', रक्तगटः बी+
शिक्षण : एम. बी. ए. (मार्केटींग)
नोकरीः आय.सी.आय.सी.आय., बँक नवीमुंबई
मा. प्रा.:
अपेक्षाः किमान पदवीधर, मुंबईमध्ये नोकरी करणारी
पत्ता : **श्री. किशोर वैद्य**
दिपश्रेया, मरीआई मंदिरा जवळ, पांगार वाडी, जालगांव, दापोली, रत्नागिरी - ४१५७१२
मोबा.- ८०८७२१३८५४/९४२२४३१८७७
-(११/२०)

**१२) चि. मांगिरीश**



**ज. ता. ३०/५/९०,**
**ज.वेळः दुपारी ३.२५**
**ज. स्थळः खेड**

रासः सिंह, नक्षत्रः मघा, नाडीः अंत्य,
चरणः २रे, गणः राक्षस, उंचीः ५'६'',
शिक्षणः बी. ई. (केमिकल)
नोकरीः घारडा केमिकल, लोटे, वा.प्रा.: ५.५ लक्ष
अपेक्षाः अनुरुप
पत्ताः **श्री. दिलीप काशिनाथ वैद्य**
स्टार ब्लॉसम टेलर, पान गल्ली,
ता. खेड, जि. रत्नांगिरी - ४१५ ७०९
मो.: ९०९६४४७६५७
E-mail: mangirishvaidya30@gmail.com
-(११/२०)

**१३) चि. सागर**



**ज. ता. ०९/६/८८,**
**ज.वेळः संध्या.५.००**
**ज. स्थळः मुंबई**

रासः मीन, नक्षत्रः रेवती, नाडीः अंत्य,
चरणः ३रे, गणः देव,
शिक्षणः बी.ई. (मेकॅनिकल)
नोकरीः अमेरिकन कंपनी, पवई-मुंबई
वा. प्रा.: ७ लक्ष,
अपेक्षाः बी.ई., एम.बी.ए., डॉक्टर
**पत्ताः श्री. शंकर धमके**
१२वा मजला, ब्लॉक नं. १२०४, एकुर को. ऑप., सोसा., पोलिस स्टेशन च्या जवळ, कांजुरमार्ग, मुंबई
**मोबा.:** ८८७९२६५२९९/
९६६४१४९६३६
-(०२/२१)

**१४) चि.गुणवंत**



**ज. ता. २३/९/८८,**
**ज.वेळः सकाळी ११.१०**
**ज. स्थळः भोपाळ**

रासः कुंभ, नाडीः मध्य, नक्षत्रः धनिष्ठा, गणः राक्षस,
उंचीः ५'६'' , वर्णः गव्हाळ, रक्तगटःB+,
शिक्षणः सॉफ्टवेअर इंजिनियरींग
नोकरीः सरकारी (कृषीविभाग भोपाळ)
मा.प्रा.: २५,०००/-
अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **गुणवंत वाव्हळ**
रुम नं. ०१/ए, सेक्टर-ए, गोपाल नगर, खजुरी कलॉ भोपाळ - ४६२०२१
मोबा.: ८७७०४६१६७६/९००९४९८०३५
-(०३/२१)

**१५) चि. गुणवंत**



**ज. ता. ४/६/९१,**
**ज.वेळः सकाळी ७.००**
**ज. स्थळः फैजपूर**

रास :कुंभ, नक्षत्रःधनिष्ठा,
नाडीः मध्य, चरण : ३रे, गणः राक्षस,
रक्तगटःB+
शिक्षण : बी. कॉम, कमर्शियल आर्ट जेजे स्कुल मुंबई
नोकरीः रिव्हॅम्प स्टुडिओ एंटरटेमेंट एजन्सी
अपेक्षाः अनुरुप
पत्ताः **श्री. चंपालाल जानकीराम सरोदे,**
एकता रहिवासी संघ, नव सोनाली सोसायटी समोर, चरई, ठाणे
मो.: ९९८७३३५३०५
-(०२/२१)

**१६) चि. विद्यासागर**



**ज. ता. २४/४/८७,**
**ज.वेळः रात्री ३.१५**
**ज.स्थळः इचलकरंजी**

रासः वृषभ, वर्णः गोरा,
उंचीः ५'४'',
शिक्षण : एम. एस.सी. बी. एड.
नोकरीः शिक्षक (माध्यमिक) सरकारी
मा. प्रा. : २०,०००/-,
अपेक्षाः अनुरुप, मनमिळाऊ, १२वी ते पदवीधर
पत्ता : **श्री. राजेंद्र विठ्ठल भंडारी**
गणेशपूरा, ता. विजापूर, जि. मेहसाणा (गुजरात)
पिन.- ३८२८७०
मोबा.: ९६२४३५९१४२
-(०३/२१)

कै. सौ. प्रभावती अंबादास साळी (सासुबाई) व कै. सौ. सुशिलाबाई मधुकर साळी (आई) यांच्या स्मरणार्थ सौ. विनिता विवेकानंद साळी, कल्याण यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

**१७) चि. राहुल**



ज. ता. ६/८/८५,
ज.वेळः संध्या. ८.४५
ज. स्थळः अमळनेर

रासः मीन, नक्षत्रः रेवती, नाडीः अंत्य,
गणः देव, उंचीः ५'५'' , रक्तगटः0+
शिक्षणः पदवीधर, नोकरीः सेल्स ऑफिसर एच.डी.बी फायनॅन्सीएल सर्विसेस, मा.प्रा.: २०,०००/-
अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **श्री. अशोक त्र्यंबक डहाके**
फ्लॅट नं. १०२, भक्तीधाम अपार्टमेंट,
इंदिरा नगर, नाशिक - ४२२ ००१
मोबा.: ८३०८१२८४९९/९७६२५४११८५
९०२८९०१५५६/७३८३३२९११०(मामा)
Email: rahu.dake@yahoo.co.in -(९/२०)

**१८) चि. गौरव**

**ज. ता. २०/६/९२, ज.वेळः रात्री १०.०५, ज. स्थळः दिवेआगर**
रास : कुंभ, नक्षत्रः धनिष्ठा, नाडीः मध्य, गणःराक्षस
उंचीः ५'७'', वर्णः गोरा,
शिक्षणः BCA, नोकरीः कॉम्प्युटर सिस्टीम ऍडमिनिस्ट्रेटोर)
अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **श्रीमती सुषमा नंदकुमार काजवे,**
रुम नं.१, योगेश्वर अपार्टमेंट, तलाठी ऑफिस जवळ, बदलापूर (पूर्व)
मोबा. ८९८३१४०१५९
(९/२०)

**१९) चि. ऋषीकेश**



ज. ता. १२/९/९१,
ज.वेळः दुपारी १.१०
ज. स्थळः अंबरनाथ

रासः तुळ, नक्षत्रः स्वाती, नाडीः अंत्य,
गणः देव, चरणः ३रे, वर्णः गोरा,
उंचीः ५'७'', रक्तगटः 0+
शिक्षण : १२वी कॉमर्स, टेक्नीशियन ऑप्ट्रिमॅटिक्स
व्यवसायः चष्मा व घडयाळाचे दुकान
मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **श्री. चंद्रकांत पांडुरंग घटे (वडील),**
रुम नं. ३७०४, न्यु बालाजी नगर, हरेराम हरेकृष्ण मित्रमंडळ, अंबरनाथ (प)
मोबा.: ९३२३५२०३५०/९३२४७१८९६६
Email: rushikeshghate@gmail.com
-(९/२०)

**२०) चि. अजिंक्य**



ज. ता. २९/०५/८७,
ज.वेळः रात्री ९.१५
ज. स्थळः ठाणे

**सौम्य मंगळ - शांती केली आहे.**
रासः मिथुन, नक्षत्रः आद्रा, नाडीः आद्य,
गणः मनुष्य, उंचीः ५'६", वर्णः गव्हाळ,
शिक्षणः Master in MIS(France) BE in IT
नोकरीः Deloitt in Mumbai (Consultant Tech.)
वा. प्रा.: ९ लक्ष
**पत्ताः श्री. विष्णू ओमकार आढाव**
३बी, उदय नगर, पाचपाखाडी,
ठाणे (प) ४००६०२
मोबा.: ९९८७९१९१६६/९८६९२४२८२६
-(१२/२०)

**२१) चि. योगेश**

**ज. ता. २७/११/८९, ज.वेळः संध्याकाळी ४.३६, ज. स्थळः बदलापूर**
रास : वृश्चिक, नक्षत्रः विशाखा, नाडीः अंत्य, गणःराक्षस, चरणः ४थे,
उंचीः ५'७'', वर्णः गोरा, रक्तगटः 0+, शिक्षणः आयटीआय, डिप्लोमा ईन मेकॅनिकल ड्रॉफ्टस्मन, नोकरीः कॉसमॉस ग्रुप ऑफ कंपनीज,
मा.प्रा.: ४०,०००/-, अपेक्षाः अनुरुप
पत्ता : **आरती रमेश दुर्गुळे,**
बी-२०४, निसर्ग पार्क, समर्थ नगर, बदलापूर (पूर्व) ४२१५०३
मोबा.: ९६९९०११८२० (भाऊ) ८०९७२५८३६१ (वहिनी)
(९/२०)

## नांदा सौख्यभरे

| **चि. सुरज** | **चि. सौ. कां. मोनिका** |
|---|---|
| श्री. शरद सिताराम आढाव | श्री. सुरेश रामदास जगताप |
| रा. उधना, सुरत | रा. उधना, सुरत |
| यांचे सुपुत्र | यांची सुकन्या |

## : आवाहन :

**ठाणे जिल्हा स्वकुल साळी समाजाच्या कार्यालयीन वास्तूसाठी समाज बांधवांनी दातृत्व भावाने सढळ हस्ते मदत करावी. कृपया खालील बँकेच्या खात्यात रक्कम जमा करावी.**

**Bank Details**

**Favousing:** Thane Jilha Swakul Sali Samaj
**Bank Name:** Bank Of Maharashtra
**Branch:** Patharli Dombivli (E)
**IFCS Code:** MAHB0000536
**Saving A/c:** 20080187289





साळी हिताय,
स्वकुळ संवर्धनम्।

॥ श्री जिव्हेश्वर प्रसन्न॥

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित

नोंदणी क्र. ई/९२८/ठाणे दि. १७/५/८८

अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त

# स्वकुळ समाचार

RNI NO.: MAHMAR/2014/57230

**कार्यालय :** फ्लॅट नं. १, साईसेवा नं.२ को. ऑप. हौ. सोसा., जन. अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व). ४२१२०१


## दिपावली विशेषांक २०२०


**अध्यक्ष :** श्री. विनोद वसंतराव सजगुले, ९८९२३९३३७१
**उपाध्यक्ष :** श्री. प्रकाश वासुदेव पावले, ८८०६९८७५६४
**उपाध्यक्ष :** श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव, ९७५७०८६९१५
**सेक्रेटरी :** श्री. राजेश शंकरराव साळी, ९९६७५८४०३२
**सहसेक्रेटरी:** सौ. शैलजा सोमनाथ कासटकर, ९८२०१४५४५१
**कोषाध्यक्ष :** श्री. ईश्वरलाल एकनाथ फंड, ८६५२२१५१६३
**अंतर्गत हिशोब तपासणीस:** श्री. बारसु सिताफळे, ९३२६१८२४३५
**कायदेशीर सल्लागार:** ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे, ९८३३५२७१२२
**आर्थिक सल्लागार:** श्री. नितीन ढवण(सी.ए.), ९८२२४५६७६६

**संपादक :** श्री. गोपाळ सुकलाल थोरात, ७७०९३१५४९८
**सहसंपादक :** श्री. अविनाश शंकर धोत्रे, ९५०३३१२५६६
**सहसंपादक :** श्री. रमेश विष्णुदास बारगजे, ९८६९४८३६००
**संपादक मंडळ सदस्य :** श्री. पुरुषोत्तम जगन्नाथ साळी, ८४२१९१०४३७
श्री. सुधाकर शिंदे-९३२२०५९७४७, श्री. शशिकांत डहाके ९८९२०२३७६३
**तांत्रिक समिती:** श्री. उदयकुमार साळी,९३२२३८६१३९(तांत्रिक सल्लागार व सामान्य प्रशासन ठाणे जिल्हा)
**तांत्रिक समिती सदस्य:** श्री. राजेश जगन्नाथ साळी-९२०९२०३६९६,
श्री. पंकज अरुण दिवटे-९८२०८८२२८९
**वेब डिझायनर:** श्री. बाळकृष्ण साळी, सुरत- ९०३३६०३६१३

**सल्लागार:** श्री. भालचंद्र नेमिचंद साळी, ९००४४४५१८१, श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर, ९८२०८२१७२६,
डॉ. किसनराव जगन्नाथ जेधे, ९८३३८२०६०१, श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव, ९७५७०८६९१५


स.न.वि.वि. जय जिव्हेश्वर,

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित **स्वकुळ समाचार** हे समाज जागृतीचे, संघटनाचे, प्रबोधनाचे, समाजात जवळीक साधण्याचे कार्य करीत आहे. स्वकुळ समाचाराचा दिवाळी विशेषांक विविध साहित्याने नटलेला, वाचनीय, आकर्षक व संग्राहक अशा स्वरुपात प्रसिध्द करण्यासाठी वाचक रसिकानी आपले विविध साहित्य, लेखन दि. १८ ऑक्टोबर २०२० पर्यंत त्वरीत पाठवावे. आपण सर्वांनी भरभरुन दिलेल्या सदिच्छा, आपले सहकार्य स्वकुळ समाचार परिवारास प्राप्त झाले आहे. त्याच स्फुर्ती व सामाजिक बांधिलकीतून स्वकुळ समाचार दीपावली विशेषांक २०१९ भगवान श्री जिव्हेश्वर कृपेने आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आशिर्वादाने सरस्वती चरणी अर्पण करुन सभासदांना दि. ०८ नोव्हेंबर २०२० रोजी प्रकाशित केला जाईल व त्यानंतर स्वकुळ समाचारच्या वेब-साईटवर अपलोड केला जाईल. मराठी माणसात दिवाळी अंकांचे महत्त्व खुप आहे. स्वकुळ समाचारचा दिवाळी अंक देखील देखणा असतो. कथा, काव्य, स्पर्धा निमित्ताने अनेक समाजबांधव-भगिनी दिवाळी अंकात योगदान देतात.

यावर्षी आपण **दिवाळी अंकाचे मानकरी** व्हा.

**बालकांसाठी** - लहानांसाठी वय १२ वर्षापर्यंत आपण बाल कविता पाठवू शकता. विषयांचे बंधन नाही. मात्र कविता जास्तीत जास्त २० ओळींपर्यंत असावी. किंवा एवाद्या बालकाने-बालिकेने विशिष्ट छंद जोपासला असेल तर त्याची माहिती पाठवा.

**तरुणांसाठी** - आमचे तरुणांना आग्रहाचे आमंत्रण. कथा-काव्य आपणास नाही जमत जाऊ द्या. आपण तंत्रज्ञान, इंटरव्हयू टेक्नीक, तंत्रज्ञानाचे भवितव्य, परीक्षा यावर स्वअनुभवावर निश्चीत लेख लिहू शकाल. आर्टस्, कॉमर्स, सायन्स, टेक्नॉलॉजी, मेडिकल, इंजिनिअरींग ..... विषयाचे बंधन नाही. जास्तीत जास्त १५०-२०० शब्दांची मर्यादा.

**वृद्धांसाठी** - सिनिअर सिटीझन्स हे तर समाजाचे मार्गदर्शक. त्यांचा अनुभव, विचार, मार्गदर्शन, प्रॉब्लेम्स, नवीन पिढीविषयी मत-मत भिन्नता आपण शब्दबद्ध करा. नको उपमा-अलंकार फक्त सोपी भाषा पण हृद्‌याला जावून भिडणारी. आपण लेख २०० शब्दांपर्यंत पाठवू शकता. लेख पाठवतांना नांव, पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर जरूर लिहा. आपला हा दिवाळी अंक अधिकाधिक वाचनीय होण्यासाठी आपण सहकार्य करावे ही विनंती. समाजसेवेचे व्रत घेतलेल्या या सामाजिक चळवळीच्या यज्ञास आर्थिक सहकार्यरुपी समिधांची अत्यंत जरुरी आहे. तरी आपण आपल्या व्यवसायाची, संस्थेची वा आपली वैयक्तिक बहुमोल जाहिरात देऊन या सामाजिक बांधिलकीतून उतराई होण्यासाठी या समाज चळवळीत सहभागी व्हावे ही नम्र विनंती.

**आपले नम्र: श्री. विनोद वसंतराव सजगुले, अध्यक्ष**

**ठाणे जिल्हा कार्यकारिणी व ठाणे जिल्हा महिला मंडळ संपादक, संपादक मंडळ व स्वकुळ समाचारचे अधिकृत प्रतिनिधी**

**❖ लेखकांनी आपले साहित्य व जाहिरातदारांनी आपला मसुदा खालील पत्त्यावर पाठवावेत. ❖**

**अध्यक्ष - श्री. विनोद वसंतराव सजगुले, रुम नं. १४७, साई नगरी समोर, मीठबंदर रोड, डॉ. कोळी क्लिनीकच्या बाजूला, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पूर्व)**
**संपादक- श्री. गोपाळ सुकलाल थोरात, घरकुल हौ. सोसा., मारुती मंदिराजवळ, शिवाजी नगर, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१, मो.- ७७०९३१५४९८**

.......................................................................................................

## जाहिरात स्विकृत पत्र

दिनांक / / २०२०

प्रति,
**स्वकुळ समाचार, संपादक, श्री. गोपाळ सुकलाल थोरात,**
**घरकुल हौ. सोसा., मारुती मंदिराजवळ, शिवाजी नगर, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१, मो.- ७७०९३१५४९८**

स्वकुळ समाचाराच्या दिपावली विशेषांक २०२० करिता / .............................विशेष पान / पूर्ण पान / अर्धे पान / पाव पान / शुभेच्छा जाहिरातीकरिता रोख / मनीऑर्डर ................. किंवा डिमांड ड्राफ्ट क्रमांक ............... रु........... दिनांक ............. सह पाठवत आहे. कृपया आमची जाहिरात पाठीमागे लिहिल्याप्रमाणे किंवा जोडलेल्या मजकुराप्रमाणे प्रसिध्द करावी. दिपावली अंकाची प्रत आम्हास पाठवावी, ही विनंती.

### -: जाहिरात संदर्भ :-

जाहिरात पाठविणाऱ्याचे नाव व पत्ता :-.......................................................................

.......................................................................................................

फोन :- .................................................. सही व शिक्का ....................................

डिमांड ड्राफ्ट कृपया **स्वकुळ समाचार** या नावाने किंवा मनीऑर्डर संपादकांच्या पत्त्यावर पाठवावेत.

# स्वकुळ समाचार दिपावली विशेषांक २०२०

**: आपले अधिकृत प्रतिनिधी :**

१) श्री. संजय सुरेश खोपे, खोपोली-९५६१८१९१९३
२) श्री. अशोक शिवदास साळी, सुरत- ९९०६९०१९७०
३) श्री. प्रविण जी. ढवण, विंचूर- ९८८१५८२७२९
४) श्री. पंडित माधवराव साळी, एरंडोल- ९४२३३४३८३०
५) श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण- ९०२१५६४०२८
६) श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, नाहूर- ८८७९५२३७५०
७) श्री. बाळकृष्ण मारुतीराव डमरे, बडोदा- ९४२६०२५११४

## दिपावली विशेषांक २०२० जाहिरातीचे दर

पान क्र. २ वर फोर कलर पूर्ण पान रु. ३,०००/-
पान क्र. ३ वर फोर कलर पूर्ण पान रु. ३,०००/-
पान क्र. ४ वर फोर कलर पूर्ण पान रु. ३,०००/-
शेवटचे पान (मलपृष्ठ) फोर कलर पूर्ण पान रु. ३,०००/-
इतरत्र फोर कलर पूर्ण पान रु. २,५००/-
इतरत्र फोर कलर अर्धे पान रु. १,५००/-

**पिवळया रंगाच्या पेपर वरील जाहिरातीचे दर**

पूर्णपान रु. १२००/- अर्धे पान रु. ६००/-
पाव पान रु. ३००/- हार्दिक शुभेच्छा रु. २००/-

**टिप: सदर निश्चित केलेले दर हे वेबसाइटवर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या स्वकुळ समाचारच्या अंकासाठी (दिवाळी अंकासाठी) राहतील. प्रत्यक्ष अंक छापून प्रसिध्द होईल त्यावेळी हे न राहता मात्र पूर्वीचेच दर लागू होतील. कृपया हे लक्षात घ्यावे ही विनंती.**

**कृपया दिनांक ०८ ऑक्टोबर २०२० पर्यंत**

१)सोबत जोडलेले जाहिरात स्विकृत पत्र पूर्ण भरुन व सही करुन इच्छित जाहिरातीचा मजकूर पाठवावा.
२) डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर संपादकांच्या पत्त्यावर पाठवावी.
३) जाहिरातीचा मजकूर जास्त असल्यास वेगळा पेपर जोडावा.

**तुमच्या कोणत्याही बँकेतील खात्यावरुन रक्कम पाठविण्याचे विवरण.**

Favouring : Swakul Samachar
Bank Name : Dombivli Nagari Sahakari Bank.
Branch : Nandivli
IFCS CODE : DNSB0000009
Saving A/c No. 009010100002199
email : sampadakswakulsamachar@gmail.com

आपली जाहिरात इ-मेलवरही पाठविता येईल. E-mail : sampadakswakulsamachar@gmail.com

**।। जाहिरात मजकूर ।।**

कार्यालयीन उपयोगा साठी
पावती क्रमांक :
रुपये :
दिनांक :

(कृपया आजच आपली बहुमोल जाहिरात पाठवून समाज संघटना व समाजशक्तिस आपले योगदान द्यावे ही नम्र विनंती.)

तारीख : ०१/०९/२०२०

**स्वकुळ साळी विद्यार्थी सहाय्यक मंडळ परेल, मुंबई.**

**विश्वस्त मंडळ**

**विषय :** शिष्यवृत्ती देण्याबाबत.

प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना मंडळातर्फे शिष्यवृत्ती दिली जाते. त्या प्रमाणे या ही वर्षी ती देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. परंतु ऑनलाईन ( एन. एफ. टी ) च्या माध्यमातून दरवर्षी विद्यार्थ्यांना त्यांच्या खात्यामध्ये जमा करतो, परंतू काही कारणास्तव ती जर जमा झाली नाही तरच आपण त्यांना चेक देत असतो. परंतू या वर्षी करोनाच्या संकटामुळे अद्याप कोणालाच घराबाहेर पडता येत नसल्यामुळे व ऑनलाईन मीटिंग घेता येत नसल्यामुळे व आता या प्रक्रियेला वेळ झाल्यामुळे वॉट्सअॅप माध्यमातून संपर्क करून पुढे जाण्याचा मार्ग काढत आहोत.

फक्त एका विश्वस्ताचा ऑनलाईन मीटिंग घ्यावी असे मत होते. पुढील वाटचाली कशी करावी या बाबत कळविण्यात यावे. आता पोस्टाची प्रक्रिया चालू झाली आहे याचा विचार करता फॉर्म ०१/०९/२०२० ते ३०/१०/२०२० पर्यंतच स्वीकारले जातील.

**माध्यम :**

1. जिव्हेश्वर प्रतिष्ठान - पुणे.
2. स्वकुळ समाचार - मुंबई - ठाणे.
3. स्वकुळ साळी विकास मंच - सोलापूर.
4. प्रत्येकाच्या ओळखीचे अथवा जवळील व्यक्तीचे फॉर्म भरून घेणे.

**आवश्यक माहिती :**

1. पासबुक वरील आय. एफ. एस. सी. कोड आवश्यक आहे व पासबुक झेरॉक्स.
2. लीव्हिंग सर्टीफिकेट व जातीचा दाखला.
3. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत अर्ज, त्यावर आय. एफ. एस. सी. कोड स्पष्ट नमूद करणे.

**शिष्यवृत्ती फॉर्म पाठवण्याचे ठिकाण :**

**श्री. दत्ता दा. साळी - मो. नं. - ९००४६९६०६९ - ८३६९१६०२३३**
चष्माघर ऑप्टीक्स & कॉन्टॅक्ट लेन्स क्लिनिक
७ मेस्त्री बिल्डींग, युनियन बँक समोर,
डॉ. एस. एस. राव रोड लालबाग, मुंबई. ४०००१२

**नोट :** समाजाच्या ऑफीस मध्ये फॉर्म पाठवू नये.

**आपले अध्यक्ष**

शांता जंत्रे

३९ कै. मुक्तेश्वर तुकाराम पावले यांचे स्मरणार्थ श्रीमती गं. भा. सुलभा मुक्तेश्वर पावले, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

कै. सौ. मिनाक्षी चंद्रकांत हावरे व कै. श्री. राहुल चंद्रकांत हावरे यांचे स्मरणार्थ श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, मुंबई-नाहुर (पूर्व) यांच्या सौजन्याने पृष्ठदान. ४०

**स्वकुळ साळी विद्यार्थी सहाय्यक मंडळ,मुंबई**

**प.ट्र.र.न.अ. ७०० / १२-१२-१९५२**

**श्री. जिव्हेश्वर भवन, रूम नं. ९, पहिला मजला, आर.एम.भट हायस्कुलजवळ, गोखाले सोसायटी लेन, परेल, मुंबई. - ४०००१२**

**इयत्ता १० वी (SSC) इयत्ता १२ वी (HSC) उत्तीर्ण व पदविका / पदवी / उच्च पदवी प्राप्त विद्यार्थ्यांसाठी वार्षिक शैक्षणिक शिष्यवृत्ती अर्ज**

प्रति,

मानिय अध्यक्ष / कार्यवाहक,
स्वकुळ साळी विद्यार्थी सहाय्यक मंडळ,
परेल, मुंबई. - ४०००१२

मी स्वकुळ साळी समाजाचा घटक असून आपल्या मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेतून मला शिष्यवृत्ती मिळावी यासाठी सदर अर्ज करीत आहे या बाबत नियम व अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मी माझी वैयक्तिक व शैक्षणिक माहिती पुढे देत असून त्या बाबतच्या पुराव्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रति सोबत जोडल्या आहेत.

| | |
|---|---|
| अर्जदार विद्यार्थी / विद्यार्थीनीचे संपूर्ण नाव | |
| अर्जदाराचा संपूर्ण पत्ता | |
| दूरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र. | |
| जन्म तारीख, वय, वर्ष | |
| चालू शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या शाळा / कॉलेजचे नाव व पत्ता | |
| मागील शैक्षणिक वर्षात पास झालेली परीक्षा | |
| परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव | |
| मिळालेले गुण व टक्केवारी | |
| कायम वास्तवाचा पत्ता | |
| वडिलांचा / पालकांचा व्यवसाय वार्षिक उत्पन्न कंपनीच्या पगाराची पावती | |

( कोअर बँकिंगची सुविधा असलेल्या बँकेच्या खातेदार अर्जदाराने कृपया पुढील माहिती भरावी )

शिष्यवृत्तीसाठी माझा अर्ज मंजूर झाल्यास मला मिळणारी रक्कम कृपया माझ्या नावे असलेल्या पुढील बँक खात्यात जमा करावी.

| | |
|---|---|
| बँकेचे नाव | |
| शाखा | |
| खातेदाराचे नाव | |
| खाते क्र. | |
| आय. एफ. एस. सी. कोड | |

उपरोक्त संपूर्ण माहिती पूर्णतः सत्य असून निकष व नियमांना अनुसरून शिष्यवृत्ती मिळावी ही नम्र विनंती.

धन्यवाद !

**ठिकाण :**　　**पालकांची सही** ----------------------------

**दि. :**　　**पालकांचे नाव** ----------------------------------------------------

**आपला विश्वासू**

**सही**

**नाव**

**स्थानिक स्वकुळसाळी समाज संस्था अथवा समाजातील सन्माननीय व्यक्तीचा दाखला**

संस्थेचे / व्यक्तीचे पूर्ण नाव :

संपूर्ण पत्ता :

दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्र. :

मी कु. ---------------------------------------------------------------------------------------- यास / हिस गेली ------------------ वर्षे

ओळखतो. त्यांनी अर्जात दिलेली माहिती खरी आहे.

**सही**

**संस्थेचा शिक्का**

**संस्थेतील पद.**

---

**स्वकुळ साळी विद्यार्थी सहाय्यक मंडळ,मुंबई. - ४०००१२**

कार्यकारिणी सभा दिनांक ---------------- रोजी श्री. -------------------------------------------------------------- यांच्या अध्यक्षतेखाली

कु. ---------------------------------------------------------------------------------------------------- यास / हिस रु. ----------------

(अक्षरी रु. ---------------------------------------------------------------------------------- ) शिष्यवृत्ती देण्याचे मान्य करण्यात आले.

शिष्यवृत्ती दिल्याचा तपशील --------------------------------------------------------------------------------------------------------

**अध्यक्ष** **कार्यवाहक** **खजिनदार**

---

**शिष्यवृत्ती अर्जासाठी महत्वाच्या सूचना**

सदर शिष्यवृत्ती फक्त इयत्ता १० वी (SSC) इयत्ता १२ वी (HSC) उत्तीर्ण तसेच पदविका, पदवी व उच्च पदी प्राप्त विद्यार्थांसाठीच देण्यात येईल.

**शिष्यवृत्तीसाठी आवश्यक कागदपत्रे** :

1. १० वी / १२ वी उत्तीर्ण अथवा पदविका, पदवी, उच्च पदवी प्राप्त परिक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र झेरॉक्स.
2. चालु शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या कॉलेज / संस्थेचे प्रमाणपत्र अथवा ओळखपत्र झेरॉक्स.
3. अर्जदाराने जातीचे प्रमाणपत्र / समाजाचा दाखला अथवा इतर योग्य कागदपत्र ज्यावर स्वकुळसाळी असा उल्लेख असेल.

**नियम व सूचना** :

1. अर्जदाराने अर्जासाठी मंडळाने प्रसिद्ध केलेल्या नमुन्याची प्रत वापरणे आवश्यक आहे.
2. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करून जोडलेली असावीत.
3. अर्ज सुवाच्छ अक्षरात पूर्ण व अचूक भरलेला असावा.
4. अर्ज कृपया फक्त साध्या पोस्टाने पाठवावेत.
5. ३० सप्टेंबर अखेत पर्यंत आलेले अर्जच फक्त विचारात घेतले जातील.
6. अर्जा बाबतच्या निर्णयाची विचारणा करण्यासाठी कृपया पत्रव्यवहार करू नये. मंजूर अर्जदारांनाच शिष्यवृत्ती बाबत कळविले जाईल.
7. शिष्यवृत्तीची रक्कम मिळाल्याची पोच पावती सही करून पाठविणे बंधन कारक आहे.
8. शिष्यवृत्ती देण्याबाबत कार्यकारी मंडळाचा निर्णय अंतिम असून या बाबतचे सर्व अधिकार मंडळ राखून ठेवीत आहे.
9. पालकांची पगाराची झेरॉक्स प्रत जोडावी.
10. पालक विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे सभासद (मेंबर) नसतील तर ते होणे आवश्यक आहे. (सभासद फी रु. २५१/- फक्त.)



## कोरोना योध्दा
## श्री. दिपेश सुभाष पाटील, बदलापूर

गेल्या मार्च महिन्यापासून संबंध भारतभर लॉकडाऊन आहे. कारण तर आपल्याला माहितच आहे की कोरोना महामारीने अख्या जगाला आपल्या विळख्यात घ्यायला सुरुवात केली. आणि यावर उपाय म्हणून लॉकडाऊन सरकारने जाहीर केलं. स्वतः पोलिस खात्यात असल्यामुळे पूर्ण परिस्थितीचा अंदाज आला होता. अपघात झाल्याने घरीच रजेवर होतो. परंतू जसा लॉकडाऊन जाहीर झाला तसा कर्तव्यावर या म्हणून संदेश आला. अत्यावश्यक सेवेतील सर्वात आधीची पायरी म्हणून पोलिस सेवा गणली जाते.

जसा होतो तसा सावरलो आणि ड्युटीवर हजर झालो. सरकारने जे नियम व अटी घालून दिल्या त्यांचे तंतोतंत पालन करावे लागते पण पोलिसांना मात्र जीव धोक्यात घालून कशी नोकरी करावी लागते हे अनुभव घेतल्या शिवाय कळत नाही. त्यात मी भिवंडी सारख्या अतिसंवेदनशील भागात कर्तव्य बजावतो. या ठिकाणी मुख्यत्वे यंत्रमाग (पावरलूम) व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे काही ना काही घटना घडत असतात आणि मग अशा ठिकाणी पोलिसांना जागते पहारे देणे बंधनकारक आहे. मी सुध्दा तेथील सर्व प्रकारची माहिती घेऊन काम करतोय. या वेळी आलेले अनुभव अतिशय विदारक आणि भयाण आहेत. कोरोना आजाराने माणसा माणसात इतके अंतर निर्माण झाले आहे की, सख्ये नातेवाईक सुध्दा जवळ येत नाहीत. ज्या वेळी बेवारस लोकांचे मृतदेह आणि त्या संबंधीत कामे करायची असतात त्यावेळी मात्र एक पोलिस म्हणून खूप कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागते. असाच एक प्रसंग इथे नमूद करतोय. एकदा माझ्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत मला बेवारस बॉडीचा पंचनामा आणि बाकी कामे करायचे असल्याने त्या स्पॉट ला गेलो. तेथील सर्व सोपस्कार उरकून मृतदेह भिवंडीच्या आय. जी. एम. हॉस्पिटलमध्ये घेऊन आलो. तेथे मृतदेह ठेवण्याची सोय नसल्याने तोच मृतदेह घेऊन कल्याण मधील रुक्मिणी हॉस्पिटलमध्ये गेलो तर तिथेही जागा शिल्लक नसल्याने तोच मृतदेह ठाण्यातील सिव्हील हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो तर तिथेही मृतदेह ठेवण्यास जागा नव्हती. शवागृह फुल होते. मग शिवाजी हॉस्पिटल, कळवा येथे गेलो. शेवटी तेथे मृतदेह जमा करुन आलो. धाकधूक तर खूप होती की तब्बल सात दिवसानंतर सदरच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी गेलो आणि अंत्यसंस्कार पूर्ण केले. असे कित्तेक अनुभव पाठीशी आहेत. बऱ्याच वेळा पैसे खिशात आहेत, समोर अन्न दिसत आहे पण वेळेअभावी दोन घास पोटाला खाऊ शकत नाही. हा माझाच नाही अनेक पोलिसांचा अनुभव आहे. कितीतरी संकटे व अडचणी असून सुध्दा मला माझ्या पोलिस सेवेचा प्रचंड अभिमान आहे. कारण आजही समाजात पोलिस नसेल तर आया-बहिणी रस्त्यावरुन बिनधास्त फिरु शकत नाहीत. सण उत्सव शांततेत साजरे होऊ शकत नाहीत. समाजाची सर्वात महत्वाची रक्तवाहिनी जर कोणती असेल तर ती माझी पोलिस सेवा. गोरगरीब, रंजले गांजलेले, अन्याय झालेले, अशा अनेक व्यक्तिंना फक्त पोलिस आधार आहेत.

सासरी होणारे सासू-सूनेचे भांडण सोडवण्यापासून ते उग्र अतिरेक्यांना थोपवण्याचे काम फक्त शूर पोलिस करु शकतो अन्य कोणात एवढी जिगर नाही. म्हणून माझे ईश्वराला सांगणे आहे की, जर पुनर्जन्म होत असेल तर मला पुन्हा पोलिस बनव. लोकांच्या शिव्या तर नित्याचीच गोष्ट आहे पोलिसांना मग त्यातून मी तरी कसा सुटेल ? या काळात रस्त्याने जाणाऱ्या मजूरांना आणि त्यांच्या मुलांना कित्येक वेळा घरातील जेवण आणून खाऊ घातले आहे. परराज्यातील मजूरांना गावी सोडण्यासाठी त्यांच्या नावाच्या लिस्ट बनवण्यापसून ते गाडीत बसवून देण्या पर्यंत सर्व प्रकारची कामे करावी लागली आहेत. मग त्यावेळी स्वतःच्या जीवाची कधीच पर्वा करु वाटली नाही. हे सर्व करत असताना माझ्या कुटुंबातील सदस्य आजारी पडले, त्यांच्या आजारपणात मनाने कच खाल्ली परंतू घाबरलेला तो पालिस काय कामाचा ? या उक्तीला आठवून पुन्हा कर्तव्यावर हजर झालो. लहान भाऊ आणि त्याची पत्नी सुध्दा पोलिस असल्याने आम्ही तिघेही कोरोना महामारी विरोधात मुख्य योध्दे म्हणून काम करत आहोत. आणि याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. कोणी तरी बोलून गेले आहे की, स्वतःसाठी जगलास तर मेलास, पण इतरांसाठी जगलास तर खऱ्या अर्थाने जगलास. आजही आमचे देशसेवेच व्रत २४ तास चालू आहे. न थकता, न घाबरता आणि असेच चालू राहील.

जय हिंद जय महाराष्ट्र !!!



# शापित युवराज

भाग -५
मागील अंक
मार्च २०२०
पासून पुढे ....



**श्री. श्रीकृष्ण साळी सर**

युवराज त्यांना सांगत होता की, रडू नका. आई रडू नका. आईसाहेबांनी त्याला आपल्या कुशीत घेतले. सर्वांचे डोळे पाणावले. युवराज डोळे बंद करून किती वेळ आईच्या कुशीत पडून राहिले. थोडं स्थिर झाल्यावर युवराज मुलांकडे वळून म्हणाले, तुमच्या वडिलांना व काकांना बोलावून घ्या व सांगा आता काळजी करू नका. आणखी एक जेव्हा केव्हा काही अडचण असेल काही मार्ग मिळत नसेल तर मित्राकडे बिनदिक्कत या.

आई, आता आम्ही निघतो. मी मधून मधून येत जाईन. युवराज उठून उभे राहिले व त्यांनी अंगदा व रश्मीस ही निघण्याविषयी इशारा केला.. सर्व तरूण एकदम युवराजांच्या गळ्यात पडले. अंगदा व रश्मीने पाहिलं की, युवराजांना आपल्या भावना काबूत ठेवणं कठीण जात आहे.

युवराज हे रूप तिच्या विचारांच्या पलिकडचे होतं. काय युवराज आपला कामधंदा घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून दुसऱ्या गरजूंना मदत करण्याइतका वेळ काढू शकतात? या माणसाचं हे वेगळंच रूप आहे. अंगदाने रश्मीकडे पाहिले ती देखील युवराजांविषयी असाच विचार करत असलेली वाटली.

बाहेर आले तर दहा वाजले होते. युवराज गाडीत बसताच म्हणाला, आधी भोजन, मग बाजार, ठीक आहे ना? दोघी त्या वातावरणातून अजून बाहेर पडल्या नव्हत्या. त्यामुळे त्या काही म्हणाल्या नाहीत.

हॅलो, रश्मीजी कुठे आहांत तुम्ही? मी काही म्हणालो.

ठीक आहे. रश्मी न समजताच म्हणाली.

मला वाटतं, अद्याप तुमचा मूड ठिकाणावर आलेला दिसत नाही.

नाही, तसं काही नाही. आम्ही तर तुमचं हे रूप पाहून दंग झाल्या आहोत. रश्मी म्हणाली. यात आश्चर्य काय आहे, असं तर होत राहतं. हं, माझ्या दृष्टीने नवीन गोष्ट म्हणजे ह्या प्रसंगी तुम्ही दोघी माझ्याबरोबर होत्या.

भोजनानंतर तिघे बाजारात फिरत होते. अंगदाने काही विशेष खरेदी केली नाही.

पण रश्मीने कुटुंबातील लोकांसाठी खरेदी केली. एका मोठया दुकानात सर्व काही मनपसंद वस्तू मिळाल्या. अंगदाने क टी-शर्ट घेतला व रश्मीने बऱ्याचश्या वस्तू युवराज त्यांच्या बरोबरच होता.

रात्री १२ वाजता त्यांना त्यांच्या खोलीवर सोडले व सकाळी ९ वाजता तयार राहण्यास सांगितले.

दुसऱ्या दिवशी रश्मीची गाडी तीन वाजता व अंगदाची गाडी सायंकाळी सहा वाजता होती. दिवसभर फिरण्याचे दोघींनी नक्की केले होते व पण युवराजांनी सकाळी ९ वाजता तयार राहण्यास सांगितले. दोघी नाराज झाल्या.

सकाळी ९ वाजता युवराज गाडी घेऊन हजर. आज तो जास्तच फ्रेश वाटत होता. तिघे कारमध्ये बसताच युवराजने गाडी बेटा (आइलॅंड) कडे वळविली. साठ कि. मी. वर असलेला हे बेट म्हणजे जणू स्वर्गच. हिरव्यागार पर्वतांनी वेढलेला हा भाग तीन बाजूंनी समुद्राने वेढलेला आहे. रेताड जमीन, दूरदूर पर्यंत फिरण्याची मजा. आधीच गर्दी होऊ लागली होती. गाडीतून उतरताच रश्मी किनाऱ्याकडे धावली व लहान लहान शंख गोळा करू लागली. अंगदा कारमध्ये बसूनच दृश्य पाहू लागली. शेजारी युवराज येऊन उभा राहिला. काय विचार करतेस?

या पृथ्वीवर काय नाही? फक्त शोधण्याची गरज आहे. हे स्थळ दाखवून तर आम्हांला विशेष उत्साहित केलं आहे. किती सुंदर दृश्य आहे.

तुझं म्हणणं बरोबर आहे. मी नेहमी येत असतो इथं. कित्येकवेळा केवळ इथं उभं राहून दृश्य पाहात राहतो. तो खडक दिसतो ना तिकडे, त्याचा सहारा घेऊन वेळ घालवत असतो. तुमच्या मित्रांसोबत येत नाहीत आपण? अंगदाने प्रश्न केला.

आजच्या या काळात अजूनपर्यंत मी मित्रांची वाट पाहत आहे. आणि आज यश आलं. तुम्हा दोघीं मित्रांबरोबर येथे आलो आहे. मला तुमचा मित्र मानतेस ना?

हो तर!

आतापर्यंत तर काही बोलली नाहीस.

एवढया दिवसात विचार करायला वेळच मिळाला नाही

म्हणून, अंगदाने म्हटले.
आता विचार करतेस का?
म्हटलं ना मित्र तर आहोतच आम्ही.
तर मग वचन द्या मित्रता कायम ठेवाल. युवराजांनी हात पुढे केला.
अंगदा थोडावेळ विचारात पडली.
मी समजलो. मला मित्र करू इच्छित नाहीस. युवराज अंगदाच्या डोळ्यात पाहात म्हणाला.
अशी गोष्ट नाही, युवराज; तुम्हांला माझ्याविषयी काय माहिती आहे? मी आपणांविषयी काही जाणत नाही. आणि आपणांला भेटून असे किती दिवस झाले? युवराज काही बोलले नाही.
मला वाटतं, तुम्हांला माझ्या बोलण्याचं वाईट वाटलं, अंगदा म्हणाली.
नाही अंगदा! मित्रत्वात वाईट काय वाटून घ्यायचं. हा एक विचार आहे. मी एवढ्या भेटीलाच चांगली मैत्री समजतो. तुम्हांला काही वेळ लागू शकतो. पण माझा विश्वास आहे की तुम्ही देखील मानाल. युवराज म्हणाला.
थोडावेळ अंगदा विचार करत राहिली. तिला युवराजच्या वागण्यात कोणतीच वाईट गोष्ट दिसली नाही. उलट ती विचार करू लागली, आजच्या काळात असे निष्कपटी मित्र मिळतात कुठे. प्रत्येक पुरूष कामुक दिसतो. युवराजांचे डोळे नेहमी तिच्या चेहऱ्यातून काही हरवलेले शोधत असतात.अच्छा, युवराजजी आपली मित्रता पक्की. असे म्हणून अंगदाने हात पुढे केला. युवराजास खूप आनंद झाला. काही क्षण अंगदाकडे तिच्या हाताकडे पहात राहिला. मग अंगदाच्या हातात हात देत म्हणाला, धन्यवाद अंगदाजी!
युवराजांनी आपला दुसरा हातसुध्दा अंगदाच्या दुसऱ्या हातात दिला. थोडावेळ दोघेही हातात हात घालून सभोवतालचा दृश्य पहात राहिले. युवराज जणू हवेत उडू लागला. त्या भागातल्या सर्व सौदर्यांचं वर्णन अंगदाला ऐकवू लागला. दोघे भटकत किनाऱ्याशी येऊन बसले. युवराज आपल्या विषयी सांगू लागला. शिक्षण, व्यापार, कुटूंब व बरेच काही नातेवाईक यांच्याबाबत सांगतांना, त्यांचे आईवडील नाहीत याचीही माहिती अंगदास झाली. अंगदाने आपल्या कुटुंबाविषयी सांगितले. एक मुलगा आहे व मित्रवत पती आहे. युवराजास लग्नाविषयी विचारले तर तो गप्प झाला. अंगदाने पुनःपुनः विचारले तर तो म्हणाला,
हा प्रश्न पुनः कधी विचारू नकोस. मी उत्तर देऊ शकणार नाही.
अंगदा विचार करू लागली, युवराजांना खोलवर जखम झालेली दिसते. कारण हा प्रश्न तर अगदी सामान्य आहे. एवढयात रश्मी तेथे आली. दोघींनी आज सलवार कमीज परिधान केले होते. तिने युवराज व अंगदाचे हात पकडून त्यांना पळवत नेले. ती पुढे निघून गेली व मग युवराज व अंगदास पकडण्यास सांगितले. अंगदाने दुपट्टा कमरेस बांधला व युवराजांना म्हणाली, चला पकडू. दोघे पळू लागले. रश्मी एका मोठ्या प्रस्तराच्या मागे लपली. अंगदा व युवराज तिला शोधत धावू लागले. बरेच दूर गेल्यावर अंगदा म्हणाली, आता माझ्याच्याने पळवत नाही. युवराजही थांबला. दोघे तेथेच बसले. गर्दी वाढत होती. थोड्या वेळाने रश्मीही तेथे आली.

पाहिलंत, मला पकडू नाही शकलात तुम्ही, रश्मी म्हणाली.

ते तिथे सुमारे १२ वाजेपर्यंत थांबले. उन्हाचा लंपडाव चालला होता. परतताना दुपारचे भोजन घेतले. युवराज त्यांना शहरातील पर्यटनस्थळे दाखविण्यास घेऊन गेले. अडीच वाजता त्यांनी रश्मीचे सामान घेतले. तिला स्टेशनवर सोडले. दोघींची गळाभेट झाली. त्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. रश्मीने युवराजासही आलिंगन दिले. त्याची दाढी कुरवाळत त्यास म्हणाली, मी जेव्हा जेव्हा या शहरात येईन, तेव्हा तेव्हा तुम्हांला भेटल्याशिवाय राहाणार नाही. माझ्या अंगदास नीट सांभाळून स्टेशवर सोडा. युवराजांना हसू आलं. रश्मीचा मनमोकळा स्वभाव त्यांना खूप आवडला. रश्मी गेल्यावर अंगदा एकटीच राहिली. युवतिला दुसरीकडे फिरायला घेऊन गेले. करणर काय? अंगदाच्या गाडीस तीन तासाचा अवधी होता. अंगदा म्हणाली सुध्दा, सगळा दिवस पसार झाला; तुम्हाला काही ऑफिस-बिफिस नाही का?

आपणांसारख्यांचा सहवास माझ्या जीवनातील स्वर्णिम क्षण आहे. या सहवासाच्या आधाराने काही चांगले क्षण माझ्या जीवन-ओळीत राहतील. अशावेळी कामाचा कोण विचार करतो, थट्टेने युवराज हसायला लागले.

अंगदा युवराजांबरोबर एकेक क्षण घालवू इच्छिते. युवराजांचे हास्य तिच्या व्यक्तिमत्वाला बहार आणत आहे. इतक्या प्रेमळ माणसाबरोबर कोणाला नाही चांगलं वाटणार? अंगदाच्या मनात विचार आला, युवराजांना जशी

हवी आहे तशी मिळाली नसावी किंवा त्यांना फसविले असणार. असं काहीतरी असू शकेल. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेली उंच इमारत दाखवून युवराज म्हणाले, हे येथील एंपोरियम आहे. शिल्पकारांनी बनविलेल्या कलाकृती इथं विकल्या जातात.

युवराज, काय या शिल्पकारांनी बनविलेल्या कलाकृतींवर त्यांचा गुजारा होतो. का यांच्या कलाकृतींची किंमत दुकानदार ताबडतोब त्यांना देतो?

माझ्या माहितीप्रमाणे हे एंपोरियम सरकारी आहे व माल विकला गेल्यावरच त्यांना पैसे दिले जात असावेत.

काय हे तुम्हांला चुकीचे नाही वाटत? जय या कारागिरांकडे उत्पन्नाचं दुसरं कोणत साधन नाही तर त्यांना किती त्रास होत असेल?

त्रास होतच असणार. पण दुसरं काय करता येईल. सरकारचे काही नियम आहेत. युवराजांनी उत्तर दिले.

युवराज, असं एखादं खाजगी एम्पोरियम नाही करता येणार का की, जेथे कारागिरांना त्यांच्या कलाकृतीचे मूल्य लागलीच देण्यात येईल व विक्रीसाठी अशी किंमत ठेवली जाईल की, ती घेतली जाईल. सरकारी एम्पोरियम मध्ये प्रत्येक वस्तूची किंमत एवढी असते की, गिऱ्हाईक सहसा येतच नाही. अशावेळी माहित नाही की, कारागिराला किती पैसे मिळत असतील व केव्हा मिळत असतील?

हे खरं आहे. ते आपल्या दुकानाचा खर्च, नोकरदारांचा खर्च, टॅक्सचा खर्च काढण्याच्या मागे असतात. सर्व त्रास होतो तो कारागिरासच.

समजत नाही, आपल्याकडे कला व कलाकारांना उपाशीपोटीच रहावे लागते. जो जितका सहनशील, त्याचेच नाव होते. किंवा नाव न होता, पोटापाण्याच्या सोयीतच बरबाद होतो. अंगदाच्या स्वरात व्यथा स्पष्ट जाणवत होती. युवराज थोडावेळ गप्प राहिले. अंगदा असंही करता येईल की, खाजगी एम्पोरियममध्ये यांच्या कलाकृतींना आणखी सुंदर बनविण्याचं प्रशिक्षण देता येईल व त्या कलाकृती येथल्या बाजाराशिवाय विदेशातही विकता येतील. प्रत्येक कलाकाराच्या कृतीवर त्याचा जीवन परिचयही दिला जावा.

खूपच सुंदर! या प्रशिक्षण केन्द्रातील निवडक कलाकरांना शिक्षकांचं काम मिळेल. कच्चा मालातून कलाकृती निर्माण करून त्यांच्याद्वारेच त्याची किंमत ठरवून घेतला येईल. बरोबर म्हणतेस. एक्सलंट आइडिया! ठरलं, अंगदा, या कामाची सुरुवात लवकरच करू या. मी वेळोवेळी तुझा सल्ला घेत जाईन, देशील ना? का नाही? एवढ्या चांगल्या कामासाठी आपण म्हणाल तेव्ही मी येथे येत जाईन. तर मग ठरलं, आवश्यकता असेला तेव्हा तुम्हाला यावं लागेल.

नक्की येईन.

युवराज खुशीत येऊन शिट्टी चाजवू लागला. अंगदाला हसू आलं.

अरे वा, तुम्हाला संगीताचं ही ज्ञान आहे.

तर, तुम्हाला येथे पुन्हा बोलविण्याचं कारण मिळालं. मी खुश आहे.

अरे वाह! आपली तऱ्हा काही निराळीच दिसते. अंगदा उत्तरली.

युवराजांनी आपल्या शर्टाची कॉलर उंच केली व खांदे उंचावले. दोघेही खळाखळाट हसायला लागले.

अंगदाला युवराजास हसताना पाहून खूप आनंद झाला. ती त्याच्याकडे टक लावून पाहू लागली.

काय पाहतेस? युवराजने विचारले.

असंच नेहमी आपण आनंदात नाही का राहू शकत?

आनंदी रहायला तसा जोडीदार तर असायला हवा.

असे मित्र का बनवत नाहीत आपण?

भेटायला तर पाहिजे.

प्रयत्न नाही करत?

करतो. म्हणून तर एवढ्या वर्षांनी आपल्यासारखी चांगली मित्र मिळाली आहे.

युवराज, चुकता, तुम्ही. गोष्ट अशीच उडवून लावू नका.

टाळत नाही, मित्रा निष्कपट व प्रेमळ मित्र मिळतच नाही. आजच्या काळात सर्वजण माझ्याकडून काही ना काही मागत असतात. तुम्हीच सांगा अशी व्यक्ती मित्रत्वाच्या व्याख्येत बसते का?

अंगदा गप्प झाली. गोष्ट खरी होती.

दोघांनी परतताना नाश्ता केला. अंगदाच्या खोलीवरून सामान घेतल व स्टेशनकडे जायला निघाले. युवराज अंगदाचा विरह लपविण्याचा प्रयत्न करू लागला. गाडीत(ट्रेनमध्ये) सामान चढवून दोघेही तेथेच बसले. दुसरे प्रवासी चढ-उतार करत होते. पण त्या दोघांच्या मनात चाललेली घालमेल कुणाला माहित नव्हती. दोघं आपल्या हृदयातील (अंतःकरणातील) भरती-ओहोटीला नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत होते. थोडं सावरून युवराज म्हणाले, अंगदा, माझ्या शहरी तू पुन्हा कधी येशील?

जेव्हा आपण बोलवाल. अंगदा म्हणाली. त्यावर युवराज हसले.
समजा, मी एखादा नवा उद्योग सुरू केला तर त्यावेळी तू माझ्याबरोबर राहशील ?
नक्कीच राहीन युवराज. पण मला हे सांगा, तुम्ही माझ्या गावी केव्हा येणार ?
जेव्हा तुम्ही बोलवाल. पुन्हा दोघे हसू लागले.
युवराज. मी नेहमी माझ्या मित्राची आठवण ठेवेन. सुखात असो की दुःखात नेहमीच आपली गरज असेल. माझे पती देखील आपणांस भेटून खुश होतील.
त्यांना माझ्यातर्फे हॅलो सांग. आणि हो, तुमच्या मुलालाही आशीर्वाद सांग. इतक्या चांगल्या साथीदाराबरोबर तर नेहमीच सुखात राहत असशील.
होय युवराज माझे पती इतके चांगले व समजदार आहेत की ते माझ्या व्यक्तित्व विकासासाठी नेहमी तत्पर असतात. त्यांना माझ्या इच्छेची किंमत आहे त्यासाठी ते समाजाची किंवा लोकांची जरा पर्वा करीत नाहीत.
म्हणून तर तुमचे मन इतके शुध्द आहे. तुमचे मन एकदम निष्कपट असून त्यात फक्त प्रेमाची भावना आहे. तुम्ही भाग्यवान आहात अंगदा. ह्या भाग्याला सांभाळून ठेव.
दोघे बोलत राहिले. गाडी सुटण्याची वेळ आली. दोघांचे डोळे पाणावले. अंगदाचा हातला हात दूरपर्यंत पाहत राहिले.
काळ आपली पाने उलटत गेला. दोघे फोनवर भेटत. गप्पा होत राहील्या. अंगदाचा पती शरदसुध्दा युवराजांशी सल्लामसलत करू लागला. रश्मीचेही फोन येत. आठवणींना उजाळा मिळत होता. जीवनाची गाडी पुढे जात होती.
एम्पोरियम्च्या उद्घाटनाला अंगदा नवऱ्याबरोबर गेली. युवराजांनी आपल्या उत्साहाचे कप्पे पार उलगडून दाखवले. अंगदाच्या नवऱ्यास त्यांच्या मैत्रीची पूर्ण खात्री पटली. शंका घ्यायला जरासुध्दा जागा राहिली नाही. दोघांनी आनंदी वातावरणात, मैत्रीचे सुंदर अनुभव घेत काही दिवस तेथे काढले व आपल्या शहरी परत आले. युवराजांनी दोन्ही शहरातले अंतर कमी करून टाकल. मनाला येईल तेव्हा फोनवर दोघांशी गप्पा होत. जीवनाच्या प्रत्येक क्षणी अंगदा व शरद यांना आठवत राहीले.

